कृषीवल
रायगड, शुक्रवार, दि. १ नोव्हेंबर २०२४
किंमत ४ ₹

## पाचशेच्या नोटांमुळे खळबळ

**अलिबाग :** गोंधळपाडा ते विजयनगरच्या दरम्यान प्रवास करीत असताना दोघांना अडीच हजार रुपये सापडल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. ऐन निवडणुकीच्या कालावधीत पैशाचा पाऊस रस्त्यात पडल्याने पोलीस यंत्रणा कामाला लागली आहे. कोणाच्यातरी खिशातून प्रवास करीत असताना ही रक्कम पडल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. बुधवारी दुपारनंतर एक महिला बुरुमखान ते गोंधळपाडा असा प्रवास करीत होती. दरम्यान गोंधळपाडा •> पान २ वर

## प्रकाश आंबेडकरांवर होणार अँजिओप्लास्टी

**पुणे :** विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झालेली असताना वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची प्रकृती बिघडली असून त्यांना गुरुवारी पहाटे खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. आंबेडकर यांच्या छातीत छोटी गाठ असून, उद्या (शुक्रवारी) त्यांच्यावर अँजिओप्लास्टी केली जाणार आहे, असे पक्षातर्फे अधिकृत पत्रक काढून माहिती देण्यात आली आहे. दरम्यान, वंचितच्या कार्यकर्त्यांनी स्वतःचे स्थान सोडून गर्दी करू नये असे •> पान २ वर

# बंद पडलेल्या शाळा पुन्हा उघडणार

## जिल्ह्यातील तीनशेहून अधिक शाळांची होणार दुरुस्ती

प्रमोद जाधव
। अलिबाग ।

पटसंख्येअभावी बंद पडलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळा पुन्हा उघडल्या जाणार आहेत. रायगड जिल्ह्यातील ३०० हून अधिक शाळा मतदानाच्या दिवशी २० नोव्हेंबरला पुन्हा सुरु होणार आहेत. या शाळांची डागडूजी, रंगरंगोटी व अन्य सुविधा उपलब्ध करण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. रायगड जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत दुरुस्तीची कामे सुरु झाली आहेत. त्यामुळे बंद पडलेल्या शाळांना पुन्हा एकदा बहर येणार आहे.

रायगड जिल्ह्यात सध्या जिल्हा परिषदेच्या सुमारे अडीच हजारहून अधिक शाळा आहेत. या शाळांमध्ये सुमारे ९५ हजारहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मागील काही वर्षापूर्वी पटसंख्ये अभावी जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पटसंख्येअभावी जिल्ह्यातील ३०० हून अधिक जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पाडण्यात आल्या. गेल्या पाच वर्षात बंद पडलेल्या शाळांकडे कोणीही फिरकला देखील नाही. त्यामुळे शाळाचा परिसरात गवत वाढणे, दारे, खिडक्या खराब होणे, भिंतीना तडे पडणे, भिंतीवरील रंग उडणे अशी बिकट अवस्था झाली आहे. यंदा रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, पनवेल, उरण, महाड, श्रीवर्धन, कर्जत सात विधानसभा मतदारसंघाचे मतदान २० नोव्हेंबरला आहे.

मतदान केंद्र सुसज्ज असणे आवश्यक आहे. त्यामुळे बंद पडलेल्या शाळांची दुरुस्ती करण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाला प्रचंड मेहनत घ्यावी लागणार आहे. शाळांमधील परिसर स्वच्छ करण्याबरोबरच उभारण्यात येणाऱ्या मतदान केंद्रावर अधिकारी व कर्मचाऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी तयारी सुरू केली आहे. शाळांमध्ये पाणी, वीज, स्वच्छतागृह अशा सुविधा उपलब्ध करण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभाग कामाला लागला आहे. मतदानामुळे जिल्ह्यातील तीनशेहून अधिक जिल्हा परिषदेच्या शाळा आता पुन्हा बोलक्या होणार आहेत.

> “मतदान केंद्र म्हणून बंद पडलेल्या शाळांचाही वापर केला जाणार आहे. वरिष्ठांच्या सूचनेनुसार या शाळा पुन्हा दुरुस्त करण्याच्या सुचना आल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु झाली आहे.”
> – पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी,प्राथमिक रायगड जिल्हा परिषद

> “बंद पडलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरुस्तीचे काम सुरु आहे. मतदान केंद्र म्हणून या शाळांचा वापर केला जाणार आहे. त्यासाठी सुविधा चांगल्या ठेवण्यासाठी काम सुरू केले आहे.”
> – राहूल देवांग, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग



**आजचा अग्रलेख**
एका ‘टम्या’ची पंचाईत

### वे|ध|क

## एक कोटीचे कोकेन जप्त

**उरण :** उलवे परिसरात राहून अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या एका नायजेरियन नागरिकाला अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने सोमवारी (ता.२८) दुपारी अटक केली. जॉर्ज ओकान्टे डासिल्व्हा (वय ३५) असे त्याचे नाव असून त्याच्याकडून तब्बल १ कोटी २ लाख ५० हजार किमतीचे कोकेन जप्त करण्यात आले आहे. नायजेरियन नागरिकांविरोधात यापूर्वीही मुंबईतील नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. उलवे सेक्टर-२५ ए मधील आर. एन. हाइट्स इमारतीमध्ये राहणारा एक आफ्रिकन नागरिक अमली पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती.त्यानुसार सहाय्यक पोलीस आयुक्त धर्मराज बनसोडे यांच्या म ार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अलका पाटील, शरद •> पान २ वर

## बॉम्बच्या अफवेने उडाली खळबळ

**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून पुणे विमानतळावरून उड्डाण करणाऱ्या तसेच पुणे विमानतळावर येणाऱ्या देश-परदेशातील विमानांमध्ये बॉम्ब असल्याचा संदेश समाज माध्यम द्वारे येत असल्याचा प्रतिकूल परिणाम विमान वाहतुकीवर होत आहे. अशाच प्रकारे विस्तारा विमान कंपनीची दिल्ली ते पुणे फ्लाईट क्रमांक युके ९९१ मध्ये बॉम्ब असल्याचा संदेश ॲडम अलंजा ६४६ ट्विटर हँडल वरून अज्ञात व्यक्तीने दिला. त्यामुळे पुणे विमानतळावर पुन्हा खळबळ उडाली. याप्रकरणी तपासानंतर ही अफवा असल्याचे निष्पन्न झाले. याबाबत विमानतळ पोलीस ठाण्यात विजय गणपत नाणेकर (वय ३५) यांनी अज्ञात ट्विटर हँडल विरोधात तक्रार दाखल केली आहे. अज्ञात व्यक्तीने ॲडम अलंजा •> पान २ वर

## सिलेंडरच्या स्फोटात तिघांचा मृत्यू

**पनवेल :** उलवे येथील जावळे गावात गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला आहे. स्फोटाची तीव्रता अतिशय भयानक होती. त्यामुळे दोन जणांचा जागीच मृत्यू झाला तर एकाने रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये आईसह दोन मुलांचा समावेश आहे. त्यात, एक १४ वर्षांची मुलगी असून एक १३ वर्षांचा मुलगा आहे. दरम्यान, आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले असून महिलेचे पती एमजीएम रुग्णालयात उपचार घेत आहेत. घरोघरी दिवे आणि विद्युत रोषणाईने घरे उजळून निघाली असतानाच दिवाळीच्या पूर्वसंध्येला नवी मुंबईत घडलेल्या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. घरातील ५ किलोच्या दोन सिलेंडरचा स्फोट झाल्याने •> पान २ वर

# शिंदे गटाकडून महिलांचा अनादर

## लाडकी बहीण योजना निव्वळ देखावा; महिला पदाधिकाऱ्यांकडून वाभाडे

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रोहा शेडसई येथील माजी सरपंच प्रिया कडू यांच्यावर पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका ठेवत त्यांना पक्षातून काढण्यात आले. परंतु त्यांनी काय पक्षविरोधी कारवाई केली हे सिध्द करण्यास जिल्हा प्रमुख राजा केणी अपयशी ठरले. अशातच कडू यांनी आपली बाजू मांडत शिंदे गटाचे वाभाडे काढले. त्यामुळे शिंदे गटात महिलांचा कायमच अनादर केला जात असल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. एका बाजूला लाडकी बहीण योजना राबवून महिलांचा सन्मान करीत असल्याचा दिखावा शिंदे सरकार करीत आहे, दुसऱ्या बाजूला पक्षातील एका महिलेवर अन्याय करण्यात आला आहे. त्यामुळे आमदारांसह शिंदे गटातील राजा केणीवर नाराजी सूर उमटत आहेत.

शेडसई ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच प्रिया कडू यांना शिंदे गटातील राजा केणी यांच्याकडून २३ ऑक्टोबर रोजी पत्र आले. पक्षविरोधी कारवाई केल्याचा आरोप करीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार पक्षातून काढण्यात आल्याचे लेखी पत्र त्यांना पाठविण्यात आले. पक्षाच्याविरोधात कोणतीही कामे केली नसतानाही तसेच एका महिलेचे मत ऐकून न घेता कडू यांच्याविरोधात केलेल्या कारवाईबाबत त्यांनी शोकांतिका व्यक्त केली आहे. तालुका प्रमुख महेश शिंदे यांनी पक्षविरोधी कारवाई केली, त्यांच्याविरोधात कोणतीही भूमिका घेतली नाही. मात्र मी पक्षाविरोधात कोणतेही काम केले नसतानाही महिला म्हणून माझ्यावर अन्याय केला आहे.

### दुटप्पी भूमिका स्पष्ट

**शिंदे व अन्य आमदारांनी बंडखोरी करीत भाजपसोबत राहून नवीन सरकार स्थापन केले. त्यानंतर झालेल्या मंत्रीमंडळ विस्तारात महिलांना कुठेही स्थान देण्यात आले नव्हते. यावरुन शिंदे गटाने कायमच महिलांबाबत दुजाभाव केला असल्याचे पहायला मिळते. तर गोगावले यांनी तत्कालिन पालकमंत्री आदिती तटकरे यांच्याबाबतही अपशब्द वापरले असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे महिलांचा अनादर करणाऱ्या शिंदे सरकारला महिला योग्य ती जागा दाखवतील, असा इशारा सर्वसामान्य महिलांकडून देण्यात आला आहे. रोहा तालुक्यातील शेडसई येथील शिंदे गटातील एका महिला माहिती नसतानाही त्यांच्यावर पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका ठेवून हकालपट्टी केली. त्यामुळे महिला सबळीकरण व सक्षमीकरणाच्या बाता बारणाऱ्या शिंदे गटातील महिलांबद्दल असलेली दुटप्पी भूमिका स्पष्ट होऊ लागली आहे.**

> “राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहिण योजना राबविली. महिला सक्षमीकरण करण्यासाठी विविध योजना राबविल्या. मात्र पक्षातील महिलेवरच अन्याय केला. ही शोकांतिका आहे. कोणत्या कारणामुळे पक्षाने कारवाई केली? तसेच शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी केवळ बदनामी केली आहे. याबाबतचा उलगडा व्हायला हवा.”
> – प्रिया कडू, माजी सरपंच शेडसई

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

- एकाच कुटुंबातील तीन ठार
- दोन जखमींवर रूग्णालयात उपचार सुरू



। बुलढाणा । प्रतिनिधी ।

हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात तिघेजण ठार तर चालकासह दोघेजण जखमी झाले आहेत. मृत एकाच कुटुंबातील असून त्यामध्ये आई-वडील आणि मुलाचा समावेश आहे. त्यांची मुलगी आणि चालक जखमी झाले असून त्यांच्यावर सिंदखेड राजा येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

गुरुवारी सकाळी भरधाव इंडिगो कार समोरून जाणाऱ्या मालवाहक ट्रकला धडकल्याने ही भीषण दुर्घटना घडली. समृद्धी द्रुतगती महामार्गाच्या नागपूर कॉरिडॉरवर चॅनेलजवळ हा अपघात घडला असल्याची माहिती महामार्ग पोलिसांच्या वरिष्ठ सूत्रांनी दिली.पोलीस उपनिरीक्षक पवार •> पान २ वर

## भाजपचा अंतर्गत वाद चव्हाट्यावर

### रवि पाटील यांच्या प्रचारात मुलासह प्रमुख कार्यकर्ते गैरहजर

। पेण । विशेष प्रतिनिधी ।

महायुतीचे उमेदवार रविशेठ पाटील यांच्या प्रचाराच्या शुभारंभ कार्यक्रमासाठी त्यांचे थोरले चिरंजीव तथा आमदारकीचे इच्छुक उमेदवार भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांची अनुउपस्थिती होती. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये वैकुंठ पाटील यांना राजकीय कार्यक्रमापासून दूर ठेवल्याची दबक्या आवाजात एकच चर्चा सुरु होती. त्याचबरोबर वैकुंठ पाटील यांचे समर्थक भाजप जिल्हा सरचिटणीस मिलींद पाटील हे वाशी विभागात कार्यक्रम होउनही गैरहजर होते. एकंदरीत वैकुंठ पाटील यांच्या उमेदवारीवरून पाटील घरामध्ये झालेले मनभेद अजून शांत झाल्याचे चित्र दिसत नाही.

पंचायत समितीचे माजी सदस्य तथा रविशेठ पाटील यांचे खंदे समर्थक व्हि.बी.पाटील यांनी आपल्या मनोगतात दादासोबत राहतील का? अशा प्रकारे वक्तव्य करून सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या मनात शंका निर्माण केली. तर धैर्यशील पाटील यांचे खंदे समर्थक मंगेश दळवी यांनी •> पान २ वर

## शॉक लागून बैलाचा मृत्यू

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

माजगांव येथे राहणारे महेश पाटील (ढवाळकर) यांच्या घराच्या पाठीमागे गुरांचा गोठा आहे. तेथील विजेचा पोलाचा शॉक लागून गोठ्यातील बैलाचा जागीच मृत्यू झाल्याने कुटुंबावरती दुखाचे सावट पसरले आहे. भातशेतीची कामे सुरु असताना ही दुर्दैवी घटना घडल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. याबाबतची माहिती मिळताच ग्रामस्थांनी बैलाला वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र बैलाचा जागीच मृत्यू झाला.

## हातरिक्षा ओढताना चालकाचा मृत्यू

- पर्यटनस्थळ माथेरान येथील घटना
- ई-रिक्षांना परवानगीची मागणी



। माथेरान । मुकुंद रांजणे ।

माथेरान येथे ब्रिटिश काळापासून वाहनांना बंदी असल्याने अंतर्गत वाहतुकीसाठी हातरिक्षाचा वापर केला जातो. आज सकाळी परशुराम उर्फ कालुराम पिरकट (वय ४५) या आदिवासी हातरिक्षा चालकाचा रिक्षा ओढताना हॉटेल शालिमारजवळ दुर्दैवी मृत्यू झाला.

मोरबे डॅम चौक जवळील निंबरवाडी येथील आदिवासी वाड्यात परशुराम राहतो. गेल्या १५ वर्षापासून माथेरान येथे हातरिक्षा ओढण्याचे काम करून तो उपजीविका करीत होता. मागील काही वर्षांपूर्वी यवतमाळ जिल्ह्यातील मजूर इथे हा व्यवसाय करीत असता त्यातील अनेक जणांचा रक्ताच्या उलट्या होऊन मृत्यू झाला आहे. तर काहींना हृदयविकाराने मृत्यू झाला आहे.

हातरिक्षा ओढताना हृदयावर प्रचंड ताण पडतो. कुटुंबाच्या पालनपोषण करण्यासाठी नाईलाजाने ही अतिकष्टादायी कामे करावी लागत आहेत. त्यामुळेच या अमानवीय प्रथेतून कायमस्वरूपी मुक्ती मिळावी, यासाठी ई-रिक्षाची मागणी श्रमिक रिक्षा संघटनेतर्फे केली आहे. आतापर्यंत २० हातरिक्षा मालकांना ई-रिक्षाची परवानगी देण्यात आली आहे. उर्वरीत ७४ हातरिक्षा चालक अद्याप ई-रिक्षाच्या प्रतीक्षेत आहेत.

सध्याचा ई-रिक्षाचा पायलट प्रोजेक्ट पूर्ण होत आला असून उर्वरित ई-रिक्षांना परवानगी देताना पायलट प्रोजेक्ट करू नये. थेट कायमस्वरूपी परवानगी द्यावी. सर्वांना ई-रिक्षांची आवश्यकता असून गावातील सगळेचजण या सेवेचा लाभ मोठ्या आनंदाने घेत आहेत. तरी लवकरच उर्वरित ७४ ई-रिक्षांना परवानगी देण्यात यावी, अशी मागणी श्रमिक रिक्षा संघटनेचे कार्यतत्पर उपाध्यक्ष प्रकाश सुतार यांनी केली आहे.

## देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणारा अटकेत

। पनवेल । वार्ताहर ।

अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणाऱ्या इसमास नवी मुंबई गुन्हेशाखा कक्ष -३ पथकाने अटक करून त्याच्या ताब्यातून अग्निशस्त्र व दोन जीवंत काडतुस असा मुद्देमाल जप्त केला आहे.

विवेक हरिविलास गिरी (रूम नं ०६, शिवशक्ती चाळ, कामगार हॉस्पिटल रोड, साईबाबा मंदिराजवळ, रामचंद्र नगर नं ०३ ठाणे, सध्या रा. हेमंत म्हात्रे यांची चाळ, गाळा नं २, गल्ली नं ४, हनुमान मंदिराजवळ रोडपाली गाव) असे याप्रकरणी अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये •> पान २ वर

# मुरूडमध्ये शिंदे गटात भगदाड

## आदिवासीवाडीवाडीमधील असंख्य मंडळी शेकापमध्ये



। अलिबाग । प्रतिनिधी ।

मुरूड शिघ्रे येथील आदिवासीवाडीमधील असंख्य कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला आहे. शिंदे गटातील पदाधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून त्यांनी शेकापच्या कार्यप्रणालीवर खुश होऊन हा प्रवेश केला. शेकापच्या वतीने या सर्व कार्यकर्त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

तालुक्यातील अनेक गावे, वाड्या शेतकरी कामगार पक्षात प्रवेश करू लागले आहेत. शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यप्रणालीवर खुश होऊन तरुण, ज्येष्ठ नागरिक, महिला पक्षात प्रवेश करत आहेत. शेकापच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासून कार्यकर्ते उत्साहाने कामाला लागले आहेत. वेगवेगळ्या गावातील कार्यकर्ते शेकापमध्ये येत आहेत. त्यामुळे पक्ष वाढीला अधिक गती मिळू लागली आहे. मुरूड तालुक्यातील शिघ्रे आदिवासीवाडीमधील •> पान २ वर

### गैरप्रकार रोखण्यासाठी प्रशासनाची मोहीम

# स्थिर सर्वेक्षण पथकामार्फत वाहन तपासणी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी स्थिर सर्वेक्षण पथक तैनात करण्यात आले आहेत. या पथकांमार्फत येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी केली जात आहे. गैरप्रकार रोखण्यासाठी ही मोहीम सुरु करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

रायगड जिल्हयातील अलिबाग, पेण, कर्जत, उरण, पनवेल, श्रीवर्धन, महाड या सात विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीचा कार्यक्रम १५ ऑक्टोबरपासून सुरु झाला. आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यासाठी महसूल व पोलीस यंत्रणा कामाला लागली आहे. निवडणुकीच्या कालावधीत कोणताही गैरप्रकार घडू नये. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. महसूल विभागासह वेगवेगळ्या विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस विभागातील अधिकारी कर्मचारी रात्रीचा दिवस करून काम करीत आहेत.

अलिबाग-पेण, अलिबाग-रोहा अलिबाग-मुरूड मार्गावरू येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी स्थिर सर्वेक्षण पथकामार्फत केली जात असताना भरारी पथकामार्फतदेखील ठिकठिकाणी भेटी देऊन तेथील पाहणी केली जात आहे. गावात होणाऱ्या सभांवरही पथकाद्वारे लक्ष ठेवण्याचे काम केले जात आहे.

अलिबाग मतदार संघातील वेगवेगळ्या मार्गावर स्थिर सर्वेक्षण पथक तयार करण्यात आले आहे. व्हिडीओग्राफर, पोलीस, व अन्य विभागातील कर्मचारी असे एकूण चार जण या ठिकाणी नेमण्यात आले आहेत. या कर्मचाऱ्यांना सकाळी दहा ते रात्री दहा आणि रात्री दहा ते सकाळी दहा अशी ड्युटी देण्यात आली आहे. •> पान २ वर



> “स्थिर सर्वेक्षण पथकातील प्रमुखांशी संपर्क साधून कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत माहिती घेतली जाईल. कर्मचाऱ्यांना त्रास होत असेल, तर त्यांची समस्या सोडविण्याचा प्रयत्न नक्की केला जाईल.”
> – मुकेश चव्हाण, उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी

### कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात

**अलिबाग – रोहा अलिबाग पेण अलिबाग मुरूड मार्गावरील रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. काही ठिकाणी खडी पसरली आहे. मातीची धुळ स्थिर सर्वेक्षण पथकातील कर्मचाऱ्यांच्या तोंडात जात आहे. काही कर्मचाऱ्यांना घशाचा त्रास झाला आहे. त्यांना तोंडावर लावण्यासाठी मास्कची सुविधा नसल्याने या कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आल्याचे बोलले जात आहे.**

# अभिजित पाटील करणार भारताचे प्रतिनिधीत्व

। अलिबाग । प्रतिनिधी ।

तैवानमध्ये होणाऱ्या कलरॉक एक्सपोजर प्रोग्राम-२०२४ या सहकार परिषदेसाठी भारताचे प्रतिनिधी म्हणून अलिबागमधील आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित सुरेश पाटील व समता पतसंस्था, कोपरगावचे मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन भट्टड यांची निवड करण्यात आली आहे. तैवानमधील तयाचुंग शहरात ४ ते ८ नोव्हेंबर २०२४ या कालावाधीत ही परिषद होणार आहे.यात आशिया खंडातील २० देशांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

पब्लिक केडीट युनियन लीग आफ द रिपब्लिक ऑफ चायना (कलरॉक) यांच्यातर्फे कलरॉक एक्सपाजर प्रोग्राम आयोजित करण्यात आला आहे. या परिषेदत सहभागी होण्यसाठी असोसिएशन ऑफ एशियन कॉन्फिडरेशन ऑफ क्रेडीत युनियन (एक्यू) यांनी प्रत्येक देशाकडून नावं मागविली होती. भारताचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पतसंस्थांचा महासंघाने आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित •> पान २ वर



# ग्रामीण भागातील आगळी-वेगळी दिवाळी



**। रायगड । प्रतिनिधी।**

दीपावली म्हणजे आनंदाची उधळण, फराळाची मेजवानी, फटाक्यांची आतषबाजी, दिव्यांची आरास, रांगोळीची सजावट, विद्युत दीपमाळा व आकाश कंदिलांची घराघरांवर केलेली रोषणाई असे चित्र असते; मात्र ग्रामीण भागात वेगळ्या पद्धतीने दिवाळी साजरी केली. दीपावली, बलीप्रतिपदा व पाडवा या दिवशी ग्रामीण भागातील शेतकरी सकाळी जनावरांचा गोठा शेणाने सारवतात. त्यानंतर जनावरांना आंघोळ घातली जाते. त्यांना रंगवले जाते. तसेच, फुग्यांनी सजवून गावच्या वेशीवर नेतात. त्यानंतर तेथे पेंढा किंवा गवत पेटवून त्यावरून या जनावरांना उड्या मारायला लावतात. दिवाळीच्या दिवशी जनावरांना अग्निवरून उडी मारायला लावल्यास त्यांना कोणतेच आजार होत नाहीत, अशी ग्रामस्थांची श्रद्धा असल्याचे शेतकरी अनंत धनावडे सांगतात.

दारासमोर रांगोळी काढून त्यावर गुरांच्या शेणाचे पाच पूंजक ठेवतात. त्यावर झेंडुची फूले ठेवली जातात. नंतर हे पूंजक सुकल्यावर शेतात सर्वत्र टाकतात. त्यामुळे शेतात चांगले पीक येते, असे शेतकरी पंढरीनाथ भघंडविलकर यांनी सांगितले. रायगडतील काही संस्था खेड्यापाड्यातील आदिवासी बांधवाच्या घरोघरी जाऊन फराळ व मिठाईचे वाटप करतात. पाडव्याच्या दिवशी नागरिक एकमेकांना भेटून दिवाळीच्या शुभेच्छा देतात. अशाप्रकारे पूर्वापार चालत आलेली परंपरा आजही ग्रामीण परिसरात सुरू आहे.

दिवाळी हा सण साजरा करण्यासाठी सर्व कुटुंबे एकत्रित येतात. विशेषतः ग्रामीण भागात दिवाळी उत्साहाने साजरी केली जाते. शेणाच्या गवळणी, पेंढ्या तयार करून त्याची पूजा केली जाते. ज्यांच्याकडे जनावरे नाहीत, ते मातीच्या गवळणी आणि पेंढ्या तयार करतात. काही गावांमध्ये या काळात जनावरांचे पूजन केले जाते. त्याचबरोबर नरक चतुर्दशीच्या दिवशी भाऊबीज साजरी करण्याची पद्धत आहे.घरांना पिवळ्या आणि नारंगी झेंडूच्या फुलांचे तोरण लागलेले पाहायला मिळते. अवघं घर फुलांनी सजवले जाते. ग्रामीण भागातील फराळात सहसा चिवड्याचे विविध प्रकार, पारंपरिक रव्याचे लाडू, करंजी, चकल्या, अनारसे व शेव असे विविध चविष्ट पदार्थ बनवले जातात. ते मित्र परिवारात वाटून आनंद द्विगुणित केला जातो.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी मातीच्या कुंड्या विकत आणल्या जातात. त्या घरी बनवून त्यात बत्ताशे टाकतात. त्यावर दिवा लावला जातो. याची शेतकरी मनोभावे पूजा करतात. घरातील मौल्यवान वस्तू, वाहन, अवजारे याचीही पूजा केली जाते. या दिवशी मोठ्या प्रमाणावर आतषबाजी केली जाते. शाळकरी मुले ही किल्ला बनवण्यात व्यस्त असतात. पाडव्याच्या दिवशी पती-पत्नी जोडीने बसून पूजा करतात. पत्नी- पतीला ओवाळते, तेव्हा पत्नीला दिवाळी भेटवस्तू देण्याची प्रथा आहे.

# कापणीच्या हंगामास दमदार सुरूवात

## मजूरांचाही भासत आहे तुटवडा

**। खांब । वार्ताहर ।**

परतीच्या पावसाने काढता पाय घेतल्यानंतर लगेचच शेतकरी वर्गाने आपल्या पावसाळी हंगामातील भात कापणीच्या हंगामास दमदार सुरुवात केली आहे .



परतीच्या पावसानेही भातशेतीचे मोठे नुकसान केले होते. या सर्व गोष्टीतून सावरून पुन्हा या वर्षी शेतकरी वर्गाने आपली कंबर कसून चालू वर्षाच्या पावसाळी हंगामात आपापल्या भातशेतीचे क्षेत्रात भात लागवड केली.

पावसाळ्यातील सहा महिन्यात सर्व गोष्टींचा सामना करून भातशेतीही चांगलीच तरली. सध्या भात कापणी, झोडणी व मळणीच्या कामात शेतकरी वर्ग गुंतला असून सर्वत्र दिपावली सणाची धामधूम सुरू असली तरी आपापली शेतीची कामे लवकरच कशी पूर्ण होतील यासाठी शेतकरी वर्ग पुरता गुंतून गेला आहे.

एकाच वेळी सर्वत्र भातशेती कापणीच्या हंगामाला सुरूवात झाली असल्याने मजूरांचाही तुटवडा भासू लागला असल्याचे शेतकरी वर्गाचे म्हणणे आहे. तर शेतीची कामे लवकरच पूर्ण व्हावीत यासाठी शेतकरी वर्ग आपल्या संपूर्ण परिवारासह शेतीच्या कामात गुंतला असल्याचे चित्र एकंदरीत परिस्थितीवरून दिसून येत आहे.

# 'मतदान करणे हा प्रत्येक मतदाराचा हक्क, तो बजावणे हि त्याची जबाबदारी'



**। म्हसळा । वार्ताहर ।**

लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक मतदाराने मतदान करणे ते मतदाराचे कर्तव्य असून ती आपली जबाबदारी आणि अधिकार असल्याचे प्रतिपादन आंबेत येथील मतदार जनजागृती कार्यक्रमात तहसीलदार सचिन खाडे यांनी करून मतदानाची टक्केवारी जास्तीत जास्त वाढविण्याचे आवाहन खाडे यांनी केले.१९४ विधानसभा मतदार संघातील आंबेत, म्हसळा आदिवासी वाडी येथे मतदार जनजागृती कार्यक्रम आयोजित प्रसंगी गटविकास अधिकारी एम. के. जाधव, निवडणूक नायब तहसीलदार संध्या अंबुर्ले, सर्व तलाठी, पंचायत समिती कर्मचारी उपस्थित होते.म्हसळा तालुक्यातील ६७ मतदान केंद्राना तहसीलदार सचिन खाडे, गटविकास अधिकारी एम. के. जाधव, माणगाव गटविकास अधिकारी संदिप जठार यांनी पहाणी केली. सर्व केंद्रावर वीज, पाणी, दिव्यांग रॅम्प अद्यावत असल्याचे तहसीलदार खाडे यांनी सांगितले.

गटविकास अधिकारी एम. के. जाधव यांनी दिव्यांगाना स्विप आणि निवडणूक प्रक्रिया तसेच मतदान केंद्राबाबत माहिती दिली.चे प्रशिक्षण दिले. जाधव यांनी मार्गदर्शन करताना १००% मतदारांनी मतदान करण्याचे आवाहन केले.या निमित्ताने सावित्रीबाई माध्यमिक विद्यालयाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक, प्राथमिक शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. श्रीकांत भावे यांना जीवनगौरव पुरस्कार सन्मान

**माणगाव :** माणगाव येथील सुप्रसिद्ध डॉक्टर श्रीकांत नारायण भावे यांना ठाणे येथे धन्वंतरी जयंती व ९ व्या आयुर्वेद दिनानिमित्ताने मंगळवार तारीख २९ ऑक्टोबर रोजी ठाणे येथे आरोग्य भारती, ठाणे मेडिको आणि इतर सहयोगी संस्थांच्या वतीने सुप्रसिद्ध ज्येष्ठ पंचांगकर्ते दा.कृ. सोमण यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. डॉक्टर श्रीकांत भावे हे माणगाव येथील सुप्रसिद्ध डॉक्टर असून विविध सामाजिक तसेच आरोग्य क्षेत्रामध्ये कार्यरत असतात. त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील कार्याचा गौरव म्हणून त्यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. डॉक्टर श्रीकांत भावे यांना मिळालेल्या या जीवनगौरव पुरस्कारा बद्दल त्यांचे विविध सामाजिक व आरोग्य संघटनांकडून वैद्यकीय क्षेत्रातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# उरण महाविद्यालयाची दिवाळी आदिवासींसोबत

**। उरण । वार्ताहर ।**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी उरण तालुक्यातील आदिवासी कातकरी बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्यात येते.

यावर्षी सारडे ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या बेलडोंगरी या आदिवासी कातकरी वाडीवर दिवाळी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात एकूण २५ महिलांना बारावारी व नऊवारी साडी, २७ पुरुषांना कपडे, १२ मुले व १२ मुलींना कपडे, शालेय साहित्य व दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए. शामा यांनी यावेळी गरीब व आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या आपल्या बांधवांसोबत दिवाळी साजरा करण्याचा उद्देश सर्वांसोबत विशद केला व दिलेली भेट स्वीकारल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनेकांनी आर्थिक मदत केली. त्यामध्ये के. ए . शामा१५०००, तानाजी घ्यार १००००, हितेंद्र घरत १००००, रोहित पाटील ५०००, नरेंद्र पाटील ४०००, तेजस आठवले २०००, नवीन राजपाल २०००, मंगेश म्हात्रे २०००, डॉ. ए.आर.चव्हाण, २०००, प्रा. व्ही एस इंदुलकर २०००. तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आर्थिक मदत केली.

उपस्थित मान्यवर व विद्यार्थ्यांच्या हस्ते आदिवासी बांधवांना दिवाळी फराळ, कपडे तसेच शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या घरी तयार केलेला दिवाळी फराळ अतिशय आनंदाच्या भावनेने आदिवासी बांधवांना सुपूर्द केला व त्या बांधवांसोबत दिवाळी पहाट संपन्न केली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी यांनी विशेष मेहनत घेतली.

# अतिश पाटील यांना पितृशोक

**। उरण । वार्ताहर ।**

कला क्षेत्रात मागील चार पाच वर्ष रायगड मधील नामवंत सूत्रसंचालकामध्ये ज्यांनी आपल नाव मोठं केलं असे अतिश पाटील (पागोटे) यांच्या वडिलांचे अचानक आकस्मित निधन झाले.२५ ऑक्टोबर २०२४ रोजी गांधी हॉस्पिटल पनवेल येथे त्यांचे निधन झाले. स्व. द्वारकानाथ गोपाळ पाटील हे शेतकरी कामगार पक्षाचे एक निष्ठावंत व स्वाभिमानी कडवट असे कार्यकर्ते होते. अचानक झालेल्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबावर दुःखाचो डोंगर कोसळला आहे. त्यांच्या या दुःखात सहभागी होण्यासाठी अनेक लोक भेट घेण्यासाठी ये-जा करत असून मंगळवारी विधानसभेचा उमेदवारी अर्ज भरल्या नंतर प्रीतम म्हात्रे यांनी आपल्या सर्व पदाधिकारी समवेत पाटील कुटुंबियांची भेट घेऊन कुटुंबाचे सांत्वन केले.



कै .द्वारकानाथ पाटील यांचे दशक्रिया विधी ३ नोव्हेंबर तर उत्तर कार्य ५ नोव्हेंबर २०२४ रोजी त्यांच्या घरी पागोटे येथे संपन्न होणार आहे. कोणत्याही प्रकारचे दुखवटे याप्रसंगी स्वीकारले जाणार नसल्याचे त्यांचे पुत्र अतिश पाटील व कुटुंबियांनी कळविले आहे. एक चांगली व्यक्ती समाजातून निघून गेल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# कर्करोगाची मोफत तपासणी शिबिराचे उद्घाटन

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

डिवाईन संस्कार रिसर्च फाउंडेशन ट्रस्टतर्फे महिलांसाठी गर्भाशयमुखाच्या कर्करोगाची मोफत तपासणी शिबिराचे उद्घाटन धनत्रयोदशीला २९ ऑक्टोबर रोजी निल हॉस्पिटल सेक्टर १ नवीन पनवेल येथे करण्यात आले. यावेळी ३० वर्षे व त्या पेक्षा जास्त वयावरील महिलांची एचपीव्ही टेस्ट करण्यात आली.



या टेस्टने गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचा प्रतिबंधक करता येतो. ही टेस्ट करण्यासाठी ३ हजार रुपये खर्च असतो. परंतु काही काळासाठी निल हॉस्पिटल येथे ही टेस्ट मोफत उपलब्ध राहणार आहे. त्याचप्रमाणे गर्भाशय मुखाचा कर्करोग टाळू शकतो का? - यावर मार्गदर्शक बीके डॉ शुभदा नील स्त्रीरोग, कॅन्सर तज्ञ (टाटा हॉस्पिटल, मुंबई), गर्भ संस्कार तज्ञ, नील हॉस्पिटल नवीन पनवेल यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ज्योती बोबे, माजी महापौर डॉ कविता चोतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, राजश्री वावेकर, डॉ. शुभदा नील, डॉ सेजल नील, आरती शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

# शेतकरी वर्गाने शेतीसाठी जलकुंडाचा प्रभावीपणे वापर करावा

## कृषीदूतांचे आवाहन

**। खांब । वार्ताहर ।**

शेतीसाठी उपयुक्त ठरत असलेल्या जलकुंडाचा शेतकरी वर्गाने प्रभावीपणे वापर करावा अशाप्रकारची माहिती कृषीदूतांकडून शेतकरी वर्गाला देण्यात आली.



खांब येथे बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापिठ अधिनस्त कृषि विज्ञान केंद्र रोहा मार्फत आणि कृषी महाविद्यालय, दापोलीच्या ग्रामीण जागृती कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत कार्यरत असलेल्या कृषी संजीवनी गटातील कृषीदूतांनी शेतीविषयक कार्यक्रमात शेतकरी वर्गाला जलकुंडाचे महत्व सांगितले. अधिक माहिती देताना स्थानिक शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी शेतात जलकुंड उभारून या जलकुंडामुळे पिकांना आवश्यक पाण्याची उपलब्धता सुनिश्चित होईल, तसेच पाण्याची बचत करण्यास मदत होईल. जलसंपदेच्या या नव्या स्त्रोतामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन सुधारेल आणि कृषी विकासाला गती मिळेल. या उपक्रमामुळे स्थानिक समुदायात जलसंवर्धनाबाबत जागरूकता वाढणार असून, पर्यावरणस्नेही शेती पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन मिळेल असे त्यांनी सांगितले.

पान १ वरून

## पाचशेच्या नोटांमुळे खळबळ

येथील होमगार्ड कार्यालयाच्या नजीक त्या महिलेला काही पैसे पडलेले दिसले. पाचशे पाचशेच्या चार नोटा म्हणजे दोन हजार रुपये त्यांना सापडल्या. त्याच रस्त्यावरून प्रवास करीत असताना एका पुरुषाला देखील पाचशे रुपयांची नोट सापडली. रस्त्यावर अचानक पैशाचा पाऊस पडल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरताच पोलिसांनी घटना स्थळी धाव घेतली. अलिबाग पोलीस ठाण्यातील कर्मचारी दैनिक पाटील यांनी जाऊन पाहणी केली. त्या महिलेने प्रामाणिकपणाने पडलेली रक्कम पोलिसांच्या ताब्यात दिली. तिच्याकडून माहिती घेण्यात आली. प्रवास करीत असताना रस रस्त्यावर पाचशेच्या नोटा पडलेल्या दिसल्याचे तीने सांगितले. परंतु ऐन निवडणुकीत रस्त्यावर पडलेल्या पैशाच्या पावसामुळे पोलिस सतर्क झाले. त्यांनी त्यांच्या खबऱ्यांकडून माहिती घेतली. तरीदेखील काही ठोस माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु कोणाच्या तरी खिशातून ही रक्कम पडल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

आणि त्यांचे सहकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतदेह बाहेर काढले. जखमींवर प्राथमिक उपचार करून सिंदखेड राजा येथे उपचारासाठी हलविले. अपघातामुळे नागपूर कॉरिडॉरवरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत केली. अपघातग्रस्त वाहनाला बॅरिगेटिंग करण्यात आले. त्यानंतर समृद्धीवरील वाहतूक पूर्ववत सुरू झाली.

नागपूर कॉरिडॉरवर पुणे येथून अमरावतीकडे जाणाऱ्या एमएच १७ एजे ९१७३ क्रमांकाच्या इंडिगो कारने ट्रक क्रमांक एमएच २१ बीएच ५९७६ ला मागून उजव्या बाजूने भरवेगात धडक दिली. यामुळे कारमधील प्रवासी शुभांगी दाभाडे (वय ३२), राजेश दाभाडे (वय ४२) यांचा जागीच मृत्यू झाला. तसेच कारमधील रियांश राजेश दाभाडे (वय ४) याला रुग्णवाहिकेद्वारे उपचारासाठी नेत असताना वाटेतच मृत्यू झाला. याशिवाय समीक्षा राजेश दाभाडे आणि वाहनचालक आश्विन धनवरकर हे किरकोळ जखमी झाले. त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आला आहे. ट्रकचालक खाजा शेख (जालना) याला सिंदखेडराजा पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

दूसरबीड येथील १०८ रुग्णवाहिकेमधील डॉ. अक्षय विघ्ने, डॉ. वैभव बोराडे, चालक शैलेश दळी, दिगांबर शिंदे यांनी जखमीवर उपचार केले. तसेच सिंदखेड राजा ग्रामीण रुग्णालयात हलवले. यावेळी बचाव कार्यामध्ये पोलीस उपनिरीक्षक पवार, पोलीस हवालदार राठोड, पोलीस जमादार किरके तसेच नाईक, पाटील, १०८ रुग्णवाहिकेचे डॉ. वैभव बोराडे व चालक शिंदे आदी सिदखेड राजा व दुसरबीड चमूतील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## भाजपचा अंतर्गत वाद चव्हाट्यावर

व्हि.बी.पाटील यांच्या वक्तव्यावर चोख उत्तर देत धैर्यशील पाटील यांचे कार्यकर्ते कसे नियोजनबध्द प्रचार करणार आहेत, याबाबत वक्तव्य केले.

एकंदरीत नेते एकत्र येउनही कार्यकर्ते एकत्र आल्याचे दिसत नाहीत. तर भाजळचे जिल्हा निवडणूक प्रमुख सतीश धारप यांनीदेखील पेण विधानसभा मतदार संघाकडे पाठ फिरवल्याची चर्चा जोर धरत आहे. ते देखील प्रचाराच्या नारळ वाढविण्याच्या कार्यक्रमाला तसेच नामनिर्देशन अर्ज भरण्याच्या कार्यक्रमाला गैरहजर होते. एकंदरीत महायुतीत मान अपमानाचे नाटय सुरू असल्याचे दिसून येते.

## मुरुडमध्ये शिंदे गटात भगदाड

असंख्य तरुणांसह त्यांच्या कुटुंबियांनी बुधवारी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. मुरूडमधील शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते तुकाराम पाटील यांच्या हस्ते सर्व कार्यकर्त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी शेकापचे मुरूड तालुका समन्वयक विक्रांत वार्डे, शिघ्रेचे सरपंच गुलाब वाघमारे, श्रीकांत वारगे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व नवनिर्वाचित कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अभिजित पाटील करणार भारताचे प्रतिनिधीत्व

सुरेश पाटील व समता पतसंस्था, कोपरगावचे सीईओ सचिन भट्टड या दोघांची निवड केली.

आशिया खंडातील ज्या २० देशांमध्ये सहकारी पतसंस्था चालतात, त्या देशांचे प्रतिनिधी या परिषदेत सहभागी होणार आहेत. पतसंस्थांसमोर कोणत्या अडचणी आहेत. त्याचा सामना करून स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागणार आहेत, सभासदांच्या हितासाठी काय करावे लागेल यावर चर्चा होणार आहे. पब्लिक केडीट युनियन लीग आफ द रिपब्लिक ऑफ चायनाचे (कलरॉक) तज्ज्ञ या परिषदेत मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेत प्रत्येक देशाचे प्रतिनिधी आपल्या देशातील पतसंस्था चळवळीचा परिचय करून देणार आहेत. पहिल्या दिवशी भारतातील पतसंस्थांबाबत माहिती देण्याची संधी अभिजित पाटील यांना मिळणार आहे.

## प्रकाश आंबेडकरांवर होणार अँजिओप्लास्टी

आवाहन पक्षातर्फे करण्यात आले आहे. प्रकाश आंबेडकर यांचा अस्वस्थ वाटत असल्याने रुग्णालयात दाखल केले, त्यांची ऑजिओग्राफी केली जाणार आहे. त्याचा अहवाल आल्यानंतर त्याची माहिती सर्वांना समाज माध्यमाच्या माध्यमातून दिली जाईल. त्यांची काळजी घेण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक आहे. कार्यकर्त्यांनी रुग्णालयाच्या बाहेर काळजी करू नये, असे आंबेडकर यांचे पुत्र सुजात आंबेडकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. प्रकाश आंबेडकर यांना अस्वस्थ वाटत असल्याने रुग्णालयात दाखल केले, त्यांची ऑजिओग्राफी करण्यात आली आहे. उजव्या बाजूच्या धमणीमध्ये छोटी गाठ आढळून आली आहे. शुक्रवारी अँजिओप्लास्टी करून ही गाठ काढली जाणार आहे. प्रकृती स्थिर असून, दुपारी त्यांनी व्यवस्थित जेवण केले आहे,असे वंचितच्या एक्स या समाजमाध्यम खात्यावरून सांगण्यात आले आहे.दरम्यान, पुढील काही दिवस आंबेडकर हे डॉक्टरांच्या निरीक्षणात राहणार आहेत. या काळात वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकूर यांच्या नेतृत्वात निवडणूक समन्वय समिति, जाहीरनामा समिती यासह अन्य पक्षाचे काम सुरु राहील असे पक्षातर्फे सांगण्यात आले.

## एक कोटीचे कोकेन जप्त

भरगुडे व त्यांच्या पथकाने सोमवारी दुपारी आर. एन. हाइट्स इमारतीमधील नायजेरियन नागरिक राहत असलेल्या फ्लॅटवर छापा मारला. या कारवाईत पोलिसांनी जॉर्ज डासिल्व्हा याला ताब्यात घेतले. त्यानंतर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने त्याच्याकडील अमली पदार्थ व इतर साहित्य जप्त केले आहे. तसेच आरोपी जॉर्ज डासिल्व्हा याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. न्यायालयाने त्याची ३१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.

पोलिसांनी जॉर्जची व त्याच्या घराची झडती घेतली असता, घरातील बेडरूममध्ये एका पिशवीत ४१० ग्रॅम वजनाचे १ कोटी २ लाख ५० हजार रुपये किमतीचे कोकेन आढळले. तसेच एक मोबाईल फोन, काळ्या रंगाचा १ टॅनीटा कंपनीचा वजन काटा, एक कात्री, १० पारदर्शक प्लास्टिकच्या पिशव्या, एक स्काय बॅग, असा मुद्देमाल सापडला.

## देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणारा अटकेत

आणि गुन्हेगारांवर वचक रहावा, यासाठी अवैध अग्निशस्त्र बाळगणारे, अंमली पदार्थ बाळगणारे व विक्री करणारे, तसेच अवैध दारूविक्री व वाहतुक करणाऱ्या इसमांची माहिती काढुन कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश नवी मुंबईचे पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे व सह पोलिस आयुक्त संजय येनपुरे यांनी सर्व पोलीस ठाणे व शाखांना दिलेले आहेत. कक्ष-३ गुन्हे शाखेकडील अधिकारी व अंमलदार यांनी अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या इसमाबाबत मिळालेल्या माहितीनुसार, जवाहर इंडस्ट्रीयल, कामोठे येथे सापळा लावला. यावेळी सकाळी दहाच्या सुमारास अल्टा प्लस ल्युब्स प्रा.लि कंपनी समोरील प्लॉट नं-१२४ जवळ आरोपी विवेक हरिविलास गिरी, हा त्याचे कब्जात देशी बनावटीचे लोखंडी पिस्तूल, २ राऊंड दारूगोळा असा अंदाजे २७ हजार रुपयांचा माल घेऊन आला होता.

पोलिसांनी त्याला तात्काळ अटक करीत कामोठे पोलीस ठाण्याते गुन्हा नोंद केला आहे. गुन्हेशाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष-३, गुन्हे शाखेचे वपोनि हनिफ मुलानी, सपोनि एकनाथ देसाई, सपोनि सुरज गोरे, पीएसआय आकाश पाटील, पोलिस हवालदार चेतन जेजुरकर, दिनेश जोशी, सचिन धनवटे, राजकुमार दुधाळ यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

## बॉम्बच्या अफवेने उडाली खळबळ

६४६ ट्विटर हँडल वरून 'आय प्लेस्ड पाईप बॉम्बस ऑन बोर्ड ऑफ द फॉलोइंग फ्लाइट्स युके' असा संदेश प्रसारित केला. धमकी असलेला मजकूर ट्विट करून विस्तारा कंपनीचे विमान दिल्ली ते पुणे या विमानाम धील प्रवासी तसेच विमानतळ परिसरातील नागरिक आणि प्रवाशांमध्ये खोटी माहिती पसरवूनन भीतीदायक वातावरण निर्माण केले. तसेच त्यांच्या जीवितास तसेच सुरक्षेस धोका निर्माण केला आहे. याबाबत विमानतळ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक एन धामणे पुढील तपास करत आहेत.

**दोन दिवसांपूर्वीही अशीच धमकी**

पुणे विमानतळावर दोन दिवसापूर्वी अशाच प्रकारे इंडिगो एअरलाइन्सच्या हैदराबाद ते पुणे, जोधपूर ते पुणे हा विमान प्रवास करणाऱ्या विमानांना 'या विमानांमध्ये बॉम्ब आहे', असा संदेश मंदआइमेसर या ट्विटर हँडल वरून आला होता. तसेच वेगवेगळ्या विमानांचे क्रमांकही देण्यात आले होते. अशाप्रकारे विमानातील प्रवासी तसेच विमानतळ परिसरातील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करून अफवा पसरवण्यात आली होती.

## स्थिर सर्वेक्षण पथकामार्फत वाहन तपासणी

तब्बल बारा तास त्यांना कर्तव्य बजावावे लागत आहे. अन्य विधानसभा मतदारसंघात फक्त आठ तास ड्युटी आणि एक आठवड्यातून सुट्टी अशी व्यवस्था तेथील निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केली आहे. परंतु अलिबागमधील निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष केल्याची प्रतिक्रीया कर्मचाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. हा दुजाभाव का असा सवाल कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## सिलेंडरच्या स्फोटात तिघांचा मृत्यू

ही दुर्दैवी घटना घडली. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी पोहोचली होती. त्यानंतर आग आटोक्यात आणण्यात आली. मात्र, या भीषण स्फोटात घरातील मंजू घांची-भाटी (४०), मुलगी लक्ष्मी (१४), मुलगा चेतन (१३) अशा तिघांचा मृत्यू झाला. तर त्यांचे वडील रमेश (४२) हे रुग्णालयात उपचार घेत आहेत. या घटनेने परिसरावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

निवडक

## मंगळसूत्राची चोरी

**नवीन पनवेल :** फुटपाथवरून पायी चालत जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून नेल्याची घटना घडली. भारती दुसाने दुपारी तीनच्या सुमारास टेलरकडे कपड्यांचे माप देण्यासाठी गेल्या होत्या.सव्वा तीनच्या सुमारास त्या घरी जात असताना सिडको गार्डन जलवायु रोड येथून फुटपाथवरून पायी चालत जात असताना एक मुलगा गार्डनच्या गेटवर मास्क लावून फोनवर बोलत होता. भारती त्याला क्रॉस करून पुढे गेल्या असता तो मुलगा पाठीमागून येऊन गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचले.

## वाचनालयात दिवाळी पहाट

**मुरूड :** रायगड जिल्हयातील जंजिरा संस्थान कालीन मुरुड च्या सार्वजनिक वाचनालयात स्थानिक कलावंताच्या कलाविष्कारातून संगीत दीपोत्सव या विविधरंगी कार्यक्रमाने दिवाळी पहाट कार्यक्रमाचे उद्‌घाटन सदस्य नैनिता कर्णिक यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. यावेळी प्रवीण बैकर, संजय गुंजाळ, ग्रंथपाल उत्कर्ष गुंजाळ, सानिका भायदे आदी कर्मचारी वर्ग आणि वाचक उपस्थित होते. सुप्रसिद्ध गायक सुरेश सदरे यांच्या गीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली.

## परीक्षांचा निकाल जाहीर

**पुणे :** द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटन्ट्स ऑफ इंडियातर्फे सप्टेंबरमध्ये घेण्यात आलेल्या इंटरमिजिएट आणि फाउंडेशन परीक्षांचा निकाल जाहीर करण्यात आला. त्यात इंटरमिजिएट परीक्षेत मुंबईच्या परमी पारेखने देशात पहिला क्रमांक पटकावला असून, फाउंडेशन परीक्षेत १९.६७ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. आयसीएआयने प्रसिद्धिपत्रकाद्वारे निकालाची माहिती दिली. देशभरातील ४५९ केंद्रांवर इंटरमिजिएट परीक्षा घेण्यात आली.

## निवडणुकीवर ॲपद्वारे नजर

**रायगड :** विधानसभा निवडणुकीत विविध विषयांची प्रभावी अंमलबजावणी करता यावी व त्यावर नियंत्रण ठेवता यावे या हेतूने भारत निवडणूक आयोगाने आयटी ॲप्लिकेशन्स विकसित केले आहेत. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे. सी व्हीजिल आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा तातडीने निपटारा करण्यासाठी निवडणूक आयोगाने हे मोबाईल ॲप विकसित केले आहे.

## सोन्याच्या दुकानात चोरी

**म्हसळा :** दिवाळी निमित्त बाजारात खरेदीसाठी गर्दी असताना तीन महिला आणि एका छोट्या मुलीने भरदिवसा दुकानातून सामान लंपास केल्याची घटना घडली आहे. म्हसळा सोनार आळीतील सुषमा वेदक यांचे सोन्याचे दुकान आहे.दुपारी तीन महिला आणी एक लहान मुलगी दुकानात आल्या. त्यांनी रोख रक्कम आणी दागिने मिळून सुमारे बावन्न हजाराचा ऐवज चोरून नेला आहे. या घटनेची म्हसळा पोलीस स्टेशनला नोंद झाली असून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# शिक्षकांची पदसंख्या घटणार

## विशेषज्ञ शिक्षकांची होणार कंत्राटी नियुक्ती

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**शालेय शिक्षण विभागाने राज्यातील अनुदानित सैनिकी शाळांसाठी केलेल्या सुधारित धोरणानुसार या शाळांतील शिक्षकांची संख्या कमी होणार आहे. सद्यस्थितीत असलेली शिक्षकांची १ हजार १४ पदे कमी होऊन ७५६ पदे करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच सैनिकी शाळांमध्ये सध्या रिक्त असलेल्या आणि भविष्यात रिक्त होणाऱ्या पदांवरील शिक्षक भरती सेवाप्रवेश विषयक प्रचलित नियमांनुसार, तसेच पवित्र प्रणालीमार्फत करणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**




सद्यस्थितीत सैनिकी शाळांमध्ये १९९५च्या शासन निर्णयानुसार सहावी ते दहावीसाठी प्रति तुकडी दोन शिक्षक, तर २००२च्या शासन निर्णयानुसार अकरावी ते बारावीसाठी प्रति तुकडी ५.५ शिक्षक लागू आहेत. त्यानुसार सध्या सहावी ते दहावीसाठी ८२६ शिक्षक, अकरावी-बारावीसाठी १८८ शिक्षक मंजूर आहेत. मात्र, या ऐवजी आता संचमान्यतेच्या निकषांनुसार राज्य शासनाच्या अखत्यारितील सर्व सैनिकी शाळांमध्ये सातारा सैनिकी शाळेप्रमाणे सहावी ते दहावीसाठी प्रति तुकडी १.५ शिक्षक पदे मंजूर करावी, तर अकरावी, बारावीसाठी प्रति वर्ग प्रति तुकडी दोन या प्रमाणे एकूण चार पदे मंजूर करण्यात येतील. त्यामुळे सहावी ते दहावीसाठी ६२० शिक्षक, तर अकरावी-बारावीसाठी १३६ अशी एकूण ७५६ पदे अशी रचना करण्यात येणार आहे. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सुधारित आकृतीबंधास प्रचलित कार्यपद्धतीनुसार सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभागाची मान्यता घेतली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध अंतिम केल्यावरही इतर विषयांच्या अध्यापनासाठी आवश्यकता भासल्यास विशेष शिक्षकांची तासिका तत्त्वावर नियुक्ती करण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यासाठी माध्यमिक शिक्षण संचालकांची मान्यता घ्यावी लागणार आहे. प्रत्येक शाळेत तीन विशेषज्ञ शिक्षकांची कंत्राटी नियुक्ती करण्यात येणार आहे.

### शिक्षकांचे समायोजन

**राज्य शासनाच्या अखत्यारितील अनुदानित सैनिकी शाळांना सीबीएसईचा अभ्यासक्रम लागू केल्यानंतर सैनिकी शाळांतील जे शिक्षक इंग्रजी माध्यमाशी किंवा सीबीएसई अभ्यासक्रमाशी सुसंगत नाहीत, सुधारित धोरणामुळे अतिरिक्त ठरत असतील किंवा इंग्रजी माध्यमातून अध्यापन करण्यास इच्छुक नसतील, अशा शिक्षकांचे इतर समकक्ष अनुदानित, शासकीय शाळांमध्ये समायोजन करावे. समायोजनापूर्वी सैनिकी शाळांतील कार्यरत शिक्षकांची सीबीएसई अभ्यासक्रमासाठी राज्यस्तरावरून अभियोग्यता चाचणी घेऊन त्यात पात्र होणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती संबंधित सैनिकी शाळांमध्ये राहील. परीक्षेत अपात्र ठरणाऱ्यांचे समायोजन करण्यात येणार आहे.**

# फटाक्यांचा पक्ष्यांच्या अधिवासाला फटका

**। रायगड । प्रतिनिधी ।**

पक्ष्यांचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्यात २७५ प्रजातींच्या पक्ष्यांचा अधिवास आहे. मात्र, सध्याचे फटाक्यांचे वाढते परिणाम हे पक्षी जीवनासाठी हानिकारक आहे. मोठा आवाज व डोळे दिपवणारा प्रकाश पक्षांसाठी घातक असल्याने पक्षांच्या अधिवास असणाऱ्या ठिकाणी फटाके उडविण्यावर निर्बंध घालणे गरजेचे आहे. यासाठी ध्वनी प्रदूषण टाळून फाटक्यांना फाटा देत दिवाळी साजरी करावी, असे आवाहन पर्यावरणप्रेमींनी केले आहे.

दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके उडविले जातात. यातील अनेक फटाके उंच आकाशात जाऊन मोठा आवाज करतात, यामुळे याचा परिणाम थेट पक्षी जीवनावर होतो. अनेक पक्षी घाबरून प्राण सोडतात. तर अनेक भाजून जखमी होतात. मोठे फटाके फुटल्यानंतर त्यातून बाहेर पडणाऱ्या विषारी वायू बरोबरच काही छरे बाहेर पडतात. ते लहान जिवांना जखमी करू शकतात. फटाक्यांच्या दारुमध्ये विषारी घटक असतात. फटाके फुटल्यामुळे निर्माण होणारे प्रदूषण पर्यावरणासाठी हानिकारक असते. फटाक्यांच्या मोठ्या आवाजामुळे पक्ष्याचा मृत्यू होतो.सुतळी बॉम्ब, रॉकेट, अशाप्रकारच्या फटक्याम धून मोठ्या प्रमाणात आवाज व धूर येतो. यामुळे ध्वनी व वायू प्रदूषणात मोठी वाढ होते. फटाके हे माणसांप्रमाणे पक्षांसाठीही घातक असतात, त्यामुळे दिवाळी फटाक्यांना फाटा देणे आवश्यक आहे.

### हे टाळणे गरजेचे आहे

**परिसरातील बाग, जुने झाडे असणाऱ्या ठिकाणी पक्ष्यांची घरटी असतात. येथे फटाके फोडू नयेत. उंच आकाशात उडणारे फटाके डोळे दिपवणारा प्रकाश व मोठा आवाज निर्माण करणारे फटाके टाळणे आवश्यक. किल्ला बाग, सिद्धेश्वर मंदिर, रुपाभवानी मंदिर परिसर, सर्व ठिकाणचे तलाव, जुनी मोठी झाडे असलेल्या बागा येथे फटाके फोडू नयेत.**

> **बुलबुल, मुनिया, विविध प्रकारचे बगळे, घारी, पोपट, चिमणी, कावळे, कोकीळ आदी पक्षी मोठ्या संख्येने आढळतात. त्यांचे संवर्धन करणे ही रायगडकरांची जबाबदारी आहे. यासाठी फटाके मुक्त दिवाळी साजरी करणे आवश्यक आहे.सध्या सर्वत्र दिवाळीचा सण साजरा होत असून या सणात लहान थोरासंह सर्वजण फटाके वाजवण्याचा आनंद लुटतात. परंतु फटाक्यामधून निघणाऱ्या धुरामुळे हवेचे प्रदूषण आणि मोठ्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषण होते. यामुळे दिवाळीत फटाके उडविणे टाळावेत.**
>
> **– गुरुनाथ घाग, पक्षीप्रेमी**

## श्रीवर्धन- अलिबाग गाडीला अखेरीस ग्रीन सिग्नल

**। श्रीवर्धन वार्ताहर ।**

एसटी महामंडळाकडून बंद केलेली श्रीवर्धन-अलिबाग गाडीला अखेरीस ग्रीन सिग्नल देण्यात आला आहे. त्यामुळे अलिबाग मार्गावरील प्रवाशांना दिलासा मिळाला आहे. श्रीवर्धन आगाराची स्थापना १९८७ रोजी झाली. स्थापनेनंतर आगाराकडून मुंबई शहरापासून तळकोकणापर्यंत तर अनेक स्थानिक फेऱ्या सुरू करण्यात आल्या. प्रशासकीय कार्यालयांचे मुख्यालय असणाऱ्या अलिबाग येथे ही अनेक वर्षे नियमित वेळापत्रकानुसार मार्गस्थ होणारी व आर्थिक उत्पन्नात अग्रेसर असणारी अलिबाग गाडी २०१८ रोजी अचानक बंद करण्यात आली. महत्त्वाची कार्यालये अलिबाग येथे असल्याने श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील शासकीय कर्मचारी व शासकीय कार्यालयात वैयक्तिक कामे असणाऱ्या नागरिकांना अलिबाग एसटी उपयुक्त होती. १९८७ ते २०१८ रोजीपर्यंत क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणारी गाडी अशी ख्याती असणारी अलिबाग एसटी आर्थिक उत्पन्न कमी असल्याचे सबब देत बंद करण्यात आली. प्रवासीवर्गाने मागणी केल्यावर समाधानासाठी काही दिवसांसाठी सदरची गाडी सुरू करण्यात आली होती, मात्र ती कायम ची बंद करण्यात आली. त्यानंतर शिवसेना (शिंदे गट) श्रीवर्धन शहर संघटना पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांची भेट घेत प्रवाशांच्या सेवेसाठी श्रीवर्धन-अलिबाग एसटी बस सुरू करावी, अशी विनंती करण्यात आली होती. प्रवासीवर्गाची दखल घेत श्रीवर्धन-अलिबाग गाडीला अखेरीस ग्रीन सिग्नल मिळाला आहे.



श्रीवर्धन येथून मार्गस्थ होण्याची वेळ सकाळी साडेपाच तर अलिबाग येथून परतीची वेळ सायंकाळी साडेचार आहे. गाडीचा जाण्या-येण्याचा मार्ग म्हसळा, माणगाव, वडखळ असा आहे.

## दुचाकी सापडली तलावात

**पनवेल :** वावंजे येथील घरातून निघून गेलेले याकूब युनिस खान यांची दुचाकी पालेखुर्द जवळील तलावात सापडून आली आहे. त्यांचा तपास पनवेल तालुका पोलीस करत आहेत. याकूब खान हे २६ ऑक्टोबर रोजी घरातून निघून गेले आहेत. त्यांची उंची पाच फूट केस काळे पांढरे अर्धवट टक्कल पडलेले आहे त्यांनी अंगात गुलाबी रंगाचे फुल बाह्यांचे शर्ट आणि राखाडी रंगाची पॅन्ट घातली आहे तालुका पोलीस ठाण्यात ते हरवली असल्याची तक्रार करण्यात आली आज २८ ऑक्टोबर रोजी तलावात त्यांची दुचाकी सापडून आली. पोलिसांनी परिसरात त्यांचे शोध घेतला मात्र ते सापडून आले नाहीत.

## सर्वसाधारण निरीक्षक रुही खान यांनी घेतला आढावा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ सुरळीत पार पाडणेकामी निवडणूक आयोगाकडून निवडणूक निरिक्षक यांची नेमणूक केली जाते. अलिबाग विधानसभा मतदार संघासाठी निवडणूक निरिक्षक सर्व साधारण म्हणून रुही खान यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.



निवडणूक निरिक्षक यांनी अलिबाग विधानसभा मतदार संघातील उमेदवारांच्या उमेदवारी अर्ज छाननीकामी उपस्थित राहून प्रक्रियेचे निरीक्षण केले. सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निरिक्षक यांनी १९२ अलिबाग विधानसभा मतदार संघामध्ये आदर्श आचार संहिता अंमलबजावणी करीता नगर परिषद, अलिबाग येथील इमारतीमध्ये स्थापित करण्यात आलेल्या निवडणूक नियंत्रण कक्षास भेट दिली व तेथील काम काजाचा आढावा घेतला.

अलिबाग विधानसभा मतदार संघातील मतदान यंत्र ठेवण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या जिल्हा क्रीडा संकुल, नेहूली, अलिबाग या ठिकाण भेट दिली. सदर ठिकाणी करण्यात आलेल्या सुरक्षा यंत्रणा तसेच नियोजनाची पाहणी करुन निवडणूक निरिक्षक त्या अनुषंगाने मार्गदर्शन केले.

मतमोजणी प्रक्रिया २३ नोव्हेंबर २०२४ रोजी पार पाडण्याकरीता जिल्हा क्रिडा संकुल, नेहूली, अलिबाग हे ठिकाण निश्चित करण्यात आलेले आहे. निवडणूक निरिक्षक यांनी सदर ठिकाणी भेट देऊन मतमोजणी प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडणेकामी करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती घेऊन, आवश्यक त्या सुचना दिल्या. उमेदवारांच्या खर्चावर नियंत्रण व आचारसंहितेचे उल्लंघन रोखण्याकरीता निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे खर्च नियंत्रण पथकांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच जनसामान्यांना याबद्दल तक्रारी करता याव्या म्हणून सी-व्हिजील सिटीझन ॲप कार्यरत आहे. हे सी-व्हीजील सीटीझन ॲप आपणास प्लेस्टोअर वर उपलब्ध आहे.

अलिबाग मतदार संघामध्ये एकूण १४ भरारी पथके, ४ स्थिर सर्वेक्षण पथक केंद्र १ आचारसंहीता पथक कार्यरत आहेत. सदर पथकांच्या माध्यमातून उमेदवारांच्या खर्चावर, आचारसंहीता उल्लंघन, बेकायदेशीर कामकाज यावर लक्ष ठेवण्यात येत आहे.

# परिचारिका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला पुन्हा मुदतवाढ

## ३० नोव्हेंबरपर्यंत घेता येणार प्रवेश

**। रायगड । प्रतिनिधी ।**

भारतीय परिचर्या परिषदेने परिचारिकाविषयक विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला पुन्हा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचे परिषदेने जाहीर केले आहे. त्यानुसार बीएस्सी नर्सिंग, एम.एस्सी. नर्सिंग, सहाय्यक परिचारिका प्रसाविका (एएनएम), सामान्य परिचर्या व प्रसाविका (जीएनएम), पदवीपूर्व सामान्य नर्सिंग (पीबीबीएस्सी नर्सिंग), पोस्ट बेसिक डिप्लोमा आणि क्रिटिकल केअरमधील परिचारिका अभ्यासक्रम (एनपीसीसी) आदींसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत प्रवेश घेता येणार आहे.

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी परिचारिकाविषयक विविध अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अद्याप सुरू आहे. सप्टेंबरमध्ये प्रवेश परीक्षा अखेरच्या टप्प्यात असताना भारतीय परिचर्या परिषदेने या संपूर्ण प्रवेश प्रक्रियेला एक महिन्याची म ुदतवाढ दिली होती. त्यानुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने ३१ ऑक्टोबरपर्यंत या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाला मुदतवाढ दिली होती. ही मुदत संपत आली असताना भारतीय परिचर्या परिषदेने पुन्हा एकदा परिचारिकाविषयक बीएस्सी नर्सिंग, एम.एस्सी. नर्सिंग, सहाय्यक परिचारका प्रसाविका (एएनएम), सामान्य परिचर्या व प्रसाविका (जीएनएम), पदवीपूर्व सामान्य



नर्सिंग (पीबीबीएस्सी नर्सिंग), पोस्ट बेसिक डिप्लोमा आणि क्रिटिकल केअरमधील परिचारिका अभ्यासक्रम (एनपीसीसी) आदींमध्ये प्रवेश घेण्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यत मुदतवाढ दिली आहे. मात्र ही मुदतवाढ देताना परिषदेने काही मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली असून, त्याचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना परिचारिका महाविद्यालये व संस्थांना दिल्या आहेत.

३१ ऑक्टोबरपर्यंत झालेले प्रवेश नियमित वर्गातील प्रवेश समजण्यात यावेत. तर १ ते ३० नोव्हेंबरदरम्यान होणारे प्रवेश हे अनियमित वर्ग समजण्यात येणार आहेत. मात्र मुदतवाढीनंतर प्रवेशाच्या संख्येत वाढ होणे आवश्यक आहे. मात्र विद्यार्थ्यांची संख्या एकूण जागांपेक्षा अधिक असता कामा नये, अशा सूचना भारतीय परिचर्या परिषदेने दिल्या आहेत. तसेच यानंतर पुन्हा प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ दिली जाणार नाही याची नोंद महाविद्यालयांनी घ्यावी, असे परिषदेने स्पष्ट केले आहे.

**परिषदेची मार्गदर्शक तत्त्वे**

बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रम ासाठी १ ते ३० नोव्हेंबरदरम्यान प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अनियमित वर्गासाठी स्वतंत्र प्रवेश परीक्षा घेण्यात यावी. तसेच परीक्षेला बसण्यासाठी विद्यार्थ्याची ८० टक्के उपस्थिती आवश्यक आहे. जीएनएम परीक्षेला बसण्यासाठी विद्यार्थ्यांची किमान ८० टक्के उपस्थिती आवश्यक आहे. त्याचप्रमाणे एएनएमच्या विद्यार्थ्यांनी पदविका प्रमाणपत्र मिळविण्यापूर्वी अभ्यासक्रमातील सर्व कौशल्ये अवगत करणे आवश्यक आहे.

## वन्यप्राण्यांच्या त्रासामुळे बळीराजा मेटाकुटीला

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुक्यात यावर्षी भातशेती जोमाने बहरली आहे. मात्र शेतात पिकलेल्या बळीराजाच्या पिवळ्या सोन्याची वन्य माकडे व डुकरांकडून नासधूस सुरू असून वन्यप्राण्यांच्या या त्रासामुळे बळीराजा मेटाकुटीला आला आहे.

तळा तालुक्यात भातशेती हा उत्पन्नाचा एकच साधन असल्यामुळे येथील बहुतांश नागरिक शेती करून आपला उदरनिर्वाह भागवितात.मात्र शेती करताना दिवसेंदिवस येणाऱ्या अडचणींमुळे येथील शेतकरी वर्ग बेजार झाला आसून दिवसेंदिवस शेतीचे प्रमाण घटत चालले आहे. गेल्यावर्षी तळा तालुक्यात २१०० हेक्टरवर भातशेतीची लागवड करण्यात आली होती. मात्र यावर्षी ती कमी होऊन १६०० हेक्टर पर्यंतच



भात लागवड करण्यात आली आहे.

यावर्षी सुरुवातीला मुसळधार कोसळलेल्या पावसामुळे भातशेती चांगलीच बहरली असली तरी परतीच्या पावसामुळे या भातशेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता आहे.

दररोज दुपारनंतर पावसाचे आगमन होत असल्याने नागरिकांकडून लवकरात लवकर भातशेती कापणी कशी होईल यासाठी प्रयत्न केले जात आहेत. मात्र वन्य माकडे आणि रानटी डुकरे यांच्याकडून भातशेतीची मोठ्या प्रमाणावर नासधूस केली जात आहे.आधीच परतीच्या पावसामुळे संकटात सापडलेल्या बळीराजाला वन्यप्राण्यांचा देखील त्रास सहन करावा लागत असून या वन्य प्राण्यांमुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो की काय अशी चिंता बळीराजाला सतावू लागली आहे.




## फुलांच्या खरेदीसाठी नागरिकांची उडाली झुंबड

# दीपोत्सवात लाल-पिवळ्या झेंडूचा भाव वधारला

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**नवरात्रोत्सव आणि दसरा झाल्यानंतर आता लगेचच दिवाळीनिमित्त बाजारात मोठ्या प्रमाणात झेंडूच्या फुलांची आवक झाली आहे. लाल, पिवळ्या आणि भगव्या रंगांच्या झेंडूच्या फुलांनी बाजारपेठा बहरल्या आहेत. दिवाळीत झेंडूच्या फुलांना विशेष महत्त्व असल्याने नागरिक झेंडू खरेदी करण्यासाठी बाजार परिसरात मोठी गर्दी करत आहेत.**

यंदा झेंडूचे चांगले उत्पन्न झाले असून झेंडूच्या फुलांना चांगला भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून नागरिकांच्या खिशाला मात्र ऐन दिवाळीत कात्री लागलेली पाहायला मिळत आहे. किरकोळ फूल बाजारात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. फुले, हार, तोरण, गजरे, आंब्याचे डहाळ खरेदीसाठी ग्राहकांची झुंबड उडाली.

किरकोळ बाजारात झेंडू ८० ते ९० रुपये प्रतिकिलोने विकला जाता आहे. फुले, तांदळाच्या लोंब्या, तोरणांनी रस्ते सजले आहेत, तर कार्यालयातून घरी परतणारे चाकरमानी खरेदीत दंग झाल्याचे पाहायला मिळत आहे, तसेच घराच्या सजावटीसाठी



तोरण खरेदीसाठी नागरिकांची गर्दी पाहावयास मिळत आहे.

एक मीटर तोरण १५० ते २०० रुपयांना मिळत आहे. दिवाळीत दारावर झेंडूच्या फुलांचे तोरण, माळा बांधण्याची परंपरा पूर्वापार चालत आलेली आहे. त्यामुळे पूजेसह घराला सजावट, वाहनांना, तसेच अन्य महत्त्वाच्या वस्तूंना झेंडूच्या फुलांचे हार घातले जातात. लक्ष्मीपूजनाला झेंडूच्या फुलांना विशेष मागणी असते.

गेल्या आठवड्यात ४० ते ६० रुपये भावाने विकल्या जाणाऱ्या झेंडूचे भाव तब्बल दोन ते तीन पट वाढले आहेत. मागील तीन-चार वर्षे झेंडूच्या फुलांना मागणी नसल्याने उत्पादकांवर फुले फेकून देण्याची वेळ आली होती.

शेतकरीदेखील झेंडूची लागवड करण्यास धजावत नव्हते, तसेच यंदा परतीच्या पावसामुळेदेखील झेंडूच्या पिकाचे मोठे नुकसान झाले होते; मात्र झेंडू फुलाला दसऱ्यापासून चांगला भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांकडून दिवाळीत चांगली कमाई होण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

# एका 'टग्या'ची पंचाईत

महाभारतात आपण शस्त्र हाती घेणार नाही अशी प्रतिज्ञा श्रीकृष्णाने केली होती. नंतर ऐन युध्दात त्याने ती मोडली. अजितदादा पवार हे काही कृष्ण नव्हेत. शिवाय हे तर कलियुग आणि त्यातही महाराष्ट्रातल्या निवडणुकांचे संघर्षयुग आहे. त्यात दादांनी आपली प्रतिज्ञा वगैरे कशाला पाळावी? त्यांनीही ती मोडली. लोकसभा निवडणुकीत दादांना कशीबशी एक जागा मिळाली. मग त्यांनी गुलाबी जाकिट घातले. पक्षाच्या कार्यक्रमात गुलाबी रंगांची पोस्टर्स लागू लागले. त्याच भरात त्यांनी विधानसभेच्या प्रचारात आपण कोणावरही टीका करणार नाही अशी घोर प्रतिज्ञा केली. त्यांच्या पीआर एजन्सीने त्यांना हा सल्ला दिला होता असे म्हणतात. दुसऱ्यावर म्हणजे काकांच्या राष्ट्रवादीवर सतत टीका करीत राहिल्याने लोकांमध्ये तुमची प्रतिमा वाईट होते असे या एजन्सीने त्यांना सांगितले. त्यामुळे आपण केवळ आपल्या विधायक कामाविषयी बोलणार अशी घोषणा दादांनी केली. कसाबसा का होईना, पण आतापर्यंत त्यांनी आपला संयम टिकवून ठेवला होता. पण गेल्या आठवड्यात बारामतीमध्ये त्यांचा बांध फुटला. बहुदा आपल्या घरी आल्यावर चार महिन्यांपूर्वीच्या आठवणी उफाळून आल्या. बोलण्याच्या ओघात शरद पवारांवर हल्ला चढवला. काकांनी आपले कुटुंब फोडल्याचा आरोप त्यांनी केला. दादांच्या विरोधात काकांच्या राष्ट्रवादीने युगेंद्र पवार यांना उतरवले आहे. युगेंद्र हे अजितदादांचे सख्खे बंधू श्रीनिवास यांचे पुत्र आहेत. त्यामुळे काका-पुतण्याची लढाई आता मूळ काकांनी आणखी पुढच्या लेव्हलला आणि पुढच्या पिढीत नेली आहे. याचाच दादांना राग आला. लोकसभेला सुप्रियाच्या विरोधात सुनेत्रा यांना उमेदवारी देणे ही जर चूक होती तर आता काकांनी पुन्हा आपल्याच घरातल्याला आपल्याविरुध्द का उभे केले आहे असा दादांचा सवाल आहे. युगेंद्र हे अमेरिकेत शिकलेले आहेत. आजपर्यंत राजकारणात नव्हते. ते पडले तर त्यांचे फारसे काहीच नुकसान नाही. मात्र अजितदादांना त्यांनी हरवले तर काकांचा तो मोठा विजय असेल.

### रडण्याची पाळी

बारामतीची लढाई दादांना सोपी नाही. सुप्रिया सुळे यांना सहा विधानसभांपैकी बारामतीतूनच सर्वाधिक मताधिक्य मिळाले होते. त्यामुळेच मतदारसंघ बदलावा असा दादांचा विचार चालू होता. पण त्याने चुकीचा संदेश गेला असता. दादांनी लढाईतून पळ काढला असा त्याचा अर्थ झाला असता. शिवाय अन्य कोठेही त्यांची लढाई सोपी नव्हतीच. त्यामुळे दादा बारामतीत आले. पण त्यांना बहुदा बदललेल्या वातावरणाचा अंदाज आला असावा. त्यामुळे त्यांनी काकांवर तोंडसुख घेतले. अर्थात काका हे पुतण्याचे बारसे जेवलेले आहेत. त्यांनी लोकसभेच्या प्रचाराची आठवण करून दिली. तेव्हा शरद पवार येतील, डोळ्यातून पाणी काढतील, पण त्याला भुलू नका असा सल्ला अजितदादा मतदारांना देत होते. त्याची आठवण काकांनी करून दिली. दादांच्या रडण्याची नक्कल वगैरे करून लोकांमध्ये हशा पिकवला. आणि शेवटी ही विचारांची लढाई आहे, यात भावनेचा संबंध नाही हे स्पष्ट केले. याला प्रत्युत्तर देणे आता दादांना कठीण आहे. एकेकाळी दादा हे स्वयंघोषित टगे होते. पण त्यांची टगेगिरी स्वपक्षीयांवरच अधिक चालली. विरोधकांना, त्यातही भाजपला भिडण्याची हिंमत त्यांना दाखवता आली नाही. आता जाहीर सभांमध्ये त्यांच्या घशात आवंढे येत आहेत. पण दैवदुर्गती किंवा त्यांचे कर्मच असे आहे की, त्यांच्याविषयी सहानुभूती वाटण्याऐवजी त्यांचे हसेच अधिक होत आहे. म्हणजे टीका न करण्याची प्रतिज्ञाही मोडली आणि गाढवही गेले अशी स्थिती या एकेकाळच्या टगे असलेल्या दादांची झाली.

### पायावर धोंडा

तासगावात तर दादांचा पूर्णच तोल गेला. सिंचन घोटाळ्याच्या चौकशीच्या फाईलवर सही करून आर आर पाटील यांनी आपला केसाने गळा कापला असा हंबरडा दादांनी फोडला. स्वतःच्या हाताने पायावर धोंडा पाडून घेणे म्हणतात तो असा. यामुळे एक तर सिंचन घोटाळ्याच्या विषयाला पुन्हा तोंड फुटले. अलिकडे विरोधकही त्यावर बोलत नव्हते. आता ते पुन्हा बोलू लागतील. बाकी दादांनी सांगितलेल्या कथेमध्ये बऱ्याच अडचणी आहेत. घोटाळ्याच्या चौकशीचे आदेश आर आर आबा मंत्रिमंडळ किंवा मुख्यमंत्र्याच्या संमतीशिवाय देऊ शकत होते काय असा मुख्य प्रश्न आहे. त्यावेळी तर अजितदादा हे स्वतःच उपमुख्यमंत्री व अविभाजित राष्ट्रवादीचे राज्यातले एक नंबरचे नेते होते. आपल्याच नेत्याला आणि पर्यायाने पक्षाला अडचणीत आणेल असा निर्णय आबांनी कधीही घेतला नसता. एक शक्यता अशी दिसते की, जनतेच्या समाधानासाठी चौकशी लावण्यात आली असे दाखवण्यापुरते हे करावे असे सर्वसंमतीने ठरवले गेले असावे. दुसरे म्हणजे तासगावात जाऊन आबांची मरणोत्तर बदनामी करून आपण मते मिळवू शकू असे अजितदादांना वाटणे हे आश्चर्यकारक आहे. आबांची प्रतिमा ही स्वच्छ व नेक गृहमंत्री होती. त्यांनी सही केलीच असेल तर त्या घोटाळ्यात नक्कीच काहीतरी पाणी मुरत असणार असेच लोकांना आता वाटण्याचा संभव अधिक आहे. नाहीतरी, खुद्द नरेंद्र मोदींनीच या भ्रष्टाचाराबाबत जाहीर आरोप केला होता. नंतर दादा भाजपसोबत जाताच त्यांना क्लिन चीट मिळाले होते. त्यामुळे एकूणच या प्रकरणाबाबत जनतेत संशय होताच. दादांच्या नव्या आरोपामुळे तो आणखी बळकट होणार आहे. आबांची सही आपल्याला देवेंद्रांनी दाखवली असे दादा म्हणाले. यातही एक गंमत आहे. देवेंद्र हे जर दादांचे खरे मित्र होते व आहेत तर त्यांनी ही फाईल का रोखून ठेवली नाही असा प्रश्न निर्माण होतो. प्रत्यक्षात देवेंद्रांनी २०१४ मध्ये मुख्यमंत्री होताच या फाईलवर सही केली व औपचारिक चौकशी सुरू झाली. दादांनी खरे तर त्यांनाच जाब विचारायला हवा. असो. प्रत्यक्षात ही चौकशी म्हणजे दादांना घाबरवण्यासाठीचे नाटक होते व म्हणूनच दादा आणि देवेंद्र आज एकत्र आहेत. दादांनी तासगावात बोलून स्वतःसोबतच देवेंद्रानाही उघडे पाडले आहे. असो. प्रचार आता कुठे सुरू झाला आहे. खरी पंचाईत अजून बाकी आहे.

विचार

# ही दिवाळी एकमेकांना जपण्याची

**_सध्या आपण अतिसंवेदनशील झालो आहोत. सोशल मीडिया, समाज, राजकारण, जातीपाती या सगळ्या माध्यमांमधून अतिसंवेदनशीलतेचे हे चित्र स्पष्ट होते. म्हणूनच या दिवाळीच्या निमित्ताने आपण बॅक टू बेसिक जाण्याचा प्रयत्नही करावा असे वाटते. पूर्वीचे जगणे अगदी साधे होते. पण लाईफस्टाईलच्या नादात आता आपण सगळ्याच बाबतीत फार पुढे गेलो आहोत. दिवाळीत तरी थोडे थांबूया आणि एकमेकांचा हात धरुया._**



**संकर्षण कऱ्हाडे**

वसुबारसेपासून सुरू होणाऱ्या दिवाळीची रंगत चढत्या भाजणीने वाढत जाते आणि निर्माण होणारे आनंदतरंग पुढील बराच काळ आयुष्य झुलवत ठेवतात. नरक चतुर्दशीचे अभ्यंगस्नान, भल्या पहाटे घेतले जाणारे देवदर्शन, घरातील थोरामोठ्यांच्या भेटीगाठी, एकत्रित फराळ आणि नंतरची सुस्तावलेली दुपार हा दिनक्रम दिवाळीची गंमत वाढवून जातो. श्रीकृष्णाने नरकासुराच्या केलेल्या वधाचे स्मरण करत कृष्णाची पूजा करुन हा दिवस पार पडतो. सायंकाळी अंगणात दिवे लावून वाईटाचा अंधार दूर करण्याची आणि सकारात्मकतेची स्वागत करण्याची प्रथा मनोभावे पाळली जाते. दिवाळीतील एक महत्त्वपूर्ण दिवस म्हणजे लक्ष्मीपूजन. या दिवशीदेखील अभ्यंगस्नान आणि देवदर्शनादी कार्यक्रमांनी सणाची सुरूवात होते. मिष्टान्नभोजनाचा सहकुटुंब आनंद घेतल्यानंतर सायंकाळी लक्ष्मीची यथाशक्ती पूजा केली जाते. या मंगलप्रसंगी घरातील सोनेनाणे, मौल्यवान वस्तू, रोख रक्कम यांच्यासह केरसुणीचीही पूजा होते. लक्ष्मीमातेला फळे, मिठाईचा नैवेद्य दाखवला जातो. रोषणाई केलेल्या घरामध्ये, दारी दिव्यांच्या माळा लुकलुकत असताना साजरी होणारी ही पूजा मोठी साजिरी दिसते. बलिप्रतिपदा हा दिवाळीतील आणखी एक महत्त्वाचा दिवस. या दिवशी विष्णूने वामन बटूचे रूप घेऊन उदार बळीराजाला जमिनीत म्हणजे पाताळात गाडले. बळीला पाताळाचे राज्य देऊन विष्णूने त्याच्या राज्याच्या द्वारपालाचे काम स्वीकारले अशी आख्यायिका आहे. त्याचे स्मरण ठेवत हा दिवस साजरा होतो. पती-पत्नीमधील नात्याचे रंग गहिरे करणारा दिवस, अशीही या सणाची ओळख आहे. या दिवशी पत्नी पतीला औक्षण करते. पती सुंदरशी भेटवस्तू देऊन तिच्या प्रेमाचा स्विकार करतो. या दिवशी आईदेखील मुलाला औक्षण करते.

भाऊबीजेच्या सणाचा तर थाटच वेगळा. 'लाडकी बहीण' मोठ्या ओढीने भावाच्या घरी येते. भावा-बहिणीमधील सुंदर नात्याला या निमित्ताने वेगळे कोंदण मिळते. दोन्हीही कुटुंब एकत्र येत हा दिवस आनंदाने साजरा करतात. औक्षण, ओवाळल्यानंतर मिळणारी भेटवस्तू, भावाचे कोडकौतुक करण्यात गुंग होणे हे सगळेच दृश्य भावा-बहिणीमधील रक्ताच्या नात्याचे गहिरे बंध दर्शवून जाते. भाऊबीज हा दिवाळीतील अखेरचा दिवस. पण या सगळ्या साजरीकरणात एकत्र येणे, एकमेकांचे कुशल विचारणे, विचारांची देवाणघेवाण, मनोरंजनाचे कार्यक्रम या सगळ्यातून मिळणारा आनंद पुढील वर्षभर टिकतो. असे हे दीपावलीचे पर्व आनंद घेऊन आले. प्रत्येकच दिवाळी सगळ्यांसाठी पर्वणी असते. यंदाच्या दिवाळीने तर मला खूप व्यस्त ठेवले आहे. हे सगळेच दिवस भरगच्च कार्यक्रमांनी सजलेले आहेत. 'दिवाळी पहाट'चे जवळपास ११ कार्यक्रम करत असल्याचा एक कलाकार म्हणून होणारा आनंद खूप मोठा आहे. मुख्य म्हणजे या कार्यक्रमांच्या निमित्ताने मला आनंद भाटे, राहुल देशपांडे, जयतीर्थ मेवुंडी, आरतीताई अंकलीकर यांच्यासारख्या दिग्गजांबरोबर तर तरुण पिढीतील आर्या आंबेकर, प्रियांका बर्वे, सन्मिता धापटे-शिंदे अशा सगळ्यांबरोबर काम करण्याची, स्टेज शेअर करण्याची संधी मिळाली. पुणे, नागपुर, बोरिवली, ठाणे अशा विविध शहरांमध्ये पार पडणारे हे कार्यक्रम माझ्यासारख्या कलाकाराला सुखावून जाणारे होते.

शेवटी दिवाळी हा समृध्दी आणि संपन्नतेचा सण आहे आणि व्यस्त राहिल्याखेरीज कलाकाराला ती मिळत नाही. तेव्हा यंदाच्या दिवाळीने व्यस्त ठेवण्याचा प्रयत्न केला आहे, असे म्हणून मी या व्यस्ततेचे मनापासून स्वागत करतो. कारण ती मिळवण्यासाठीच माझ्यासारखे अनेकजण मुंबईत येत असतात. तेव्हा वैयक्तिकदृष्ट्या सांगायचे तर ही दिवाळी अशी लगबगीची आणि अभिव्यक्तीचे अपूर्व समाधान देणारी आहे. दुसरीकडे स्वतःच्या परिघाबाहेर जाऊन विचार करता या देखण्या सणाचे अनेक कंगोरे दिसतात. पूर्वी दिवाळीत मोठ्या प्रमाणावर फटाके उडवले जायचे. आता त्याचे प्रमाण कमी झाले असले तरी संपलेले नाही. खरे सांगायचे तर दिवाळीत दारु उडवण्यामागील कारणच एकदाचा मनातल्या बारुदाचा निचरा करणे, हे आहे. एकदा मनातील निराशेचा, क्षोभाचा, नकारात्मतेचा फटका फुटला; मोठा आवाज झाला की नंतर पणतीसारखे शांत तेवत राहावे, असे मला वाटते. सध्या आपण आयुष्याकडे नानाविध कोनातून पाहतो. नानाविध तर्क लावतो. राजकारणामुळे म्हणा वा अन्य कोणत्या गोष्टींमुळे... सध्या वातावरण अतिशय संवेदनशील झाले आहे. कोणत्याही गोष्टीविषयी एखादे मत मांडले आणि त्यामुळे ठराविक लोकांच्या भावना दुखावल्या तर ते आपल्याबरोबरच समाजासाठीही अतिशय त्रासदायक ठरु शकते. म्हणूनच आपणा सर्वांनी, समाजाने ही दिवाळी संवेदनशीलतेची दिवाळी म्हणून साजरी करायला हवी. कोणालाही न दुखवता, कोणाविरुद्ध काही चुकीचे न बोलता, कोणालाही त्रास होईल असे न वागता एकमेकांना जपण्याची ही दिवाळी असायला हवी, असे समाजाचा एक घटक या नात्याने प्रामाणिकपणे वाटते.

दिवाळी हा एकमेकांना त्रास देण्याचा काळ नाही. आपण सगळेच वेगवेगळ्या बाबतींमध्ये संवेदनशील झालो असून सोशल मीडिया, समाज, राजकारण, जातीपाती या सगळ्या माध्यमांमधून अतिसंवेदनशीलतेचे हे चित्र स्पष्ट होते. या दिवाळीच्या निमित्ताने आपण 'बॅक टू बेसिक' जाण्याचा प्रयत्नही करावा. पूर्वीचे जगणे अगदी साधे होते. पण लाईफस्टाईलच्या नादात आता आपण सगळ्याच बाबतीत फार पुढे आलो आहोत. याचा परिणाम म्हणजे सगळ्याच गोष्टींचा चिकित्सक अभ्यास करायला शिकलो आहोत. अगदी साधे उदाहरण घ्यायचे तर आजी-आजोबांच्या काळात गुळ वापरा, पौष्टिक खा, एकमेकांना भेटा, मनमोकळ्या गप्पा मारा, मन मोकळे करा, भावनांचा निचरा करा हे कधी कोणाला सांगावे लागत नसे. ते सहजतेने, जगण्याचा एक भाग म्हणून घडत होते. पण आता ते आवर्जून सांगावे लागते. म्हणूनच आता 'बॅक टू बेसिक' या अर्थाने दिवाळी साजरी करायला हवी. दिवाळीनिमित्त रोषणाई केली पाहिजे तेवढ्या गाठीभेटीही घेतल्या पाहिजेत. ही दिवाळी नात्यांचे महत्त्व ओळखून साजरी करायला पाहिजे.

आमच्याकडे परभणीला दिवाळीला घरी आला नाही असा एकही माणूस नसायचा. त्यात बाबांच्या बँकेतले शिपाई यायचे, काम करणारी बिस्मीला भाभी, गल्लीतले ऑटोवालो, हातगाडीवाले असायचे. थोडक्यात आजोबांच्या जुन्या मित्रांपासून, बाबांचे मित्र, सहकारी, आम्हाला शाळेत सोडणारे अब्दुल चाचा अशा सगळ्यांचीच सरमिसळ असायची. केळीच्या पानावर सगळ्यांचा एकत्रित फराळ असायचा. तशी दिवाळी पुन्हा साजरी व्हायला हवी. परभणीला अनुभवली तशी... एकदा बाबांनी आमच्यासाठी ५०० रुपयांचे फटाके आणले होते तर वाटले होते की, अरे बापरे... आपण त्यांना इतका जास्त खर्च करावा लावला. आता इतक्या पैशात फुलबाजीचे पाकिटही येत नाही. त्यामुळे ही दिवाळी खर्चापेक्षा मोल ओळखण्याची असावी असे मनापासून वाटते. ही दिवाळी नात्यांमधला समजुतदार परत आणण्यासाठीही असावी. अगदी घरातले उदाहरण सांगतो. आधी मी दिवाळीत तरी परभणीला यावे, असे बाबांना खूप वाटायचे. पण हेच आमच्यासारख्या कलाकारांसाठी व्यस्ततेचे दिवस आहेत हे समजू लागले तसा त्यांनी हा हट्ट सोडला. आता ते म्हणतात, आम्हीच सगळे मुंबईला येतो. तुझी व्यस्तता हीच आमची दिवाळी...! त्यानुसार आता माझे सगळे कुटुंब 'दिवाळी पहाट'च्या कार्यक्रमाला येते. मंडळी तिकीट काढून पहिल्या रांगेत बसतात आणि मनापासून आनंद घेतात. तेव्हा अशा प्रकारे एकमेकांना समजून घेऊन दिवाळी साजरी करण्याची भावना कुटुंब, समाज आणि त्यातील प्रत्येक स्तरात रुजायला हवी.

आणखी एक सांगायचे म्हणजे सोशल मीडिया, ट्रोलिंग, आरक्षण, निवडणुका अशा कोणत्याही माध्यमातून एकमेकांना न दुखावण्याची ही दिवाळी व्हायला हवी. शेवटी सगळे आपले आहेत. मनात नेहमी एक विचार येतो, की आत्ता एकमेकांविरुद्ध उभी ठाकणारी, भांडणारी दोन माणसे उद्या भारत-पाकिस्तानच्या सीमेवर असतील आणि समोरुन एखादा दहशतवादी येत असेल तर निश्चितच ते दोघे मिळून त्याला मारतील ना? मग याच भावनेने इथेही जगायला काय हरकत आहे? तेव्हा आपल्या असतील त्या भावना, विचार, म्हणणे एकमेकांना हलक्या स्वरात आणि चांगल्या भाषेत सांगून सगळ्यांना आपलेसे करायची ही दिवाळी आहे. शिवाजी महाराजांच्या काळात आपण सगळेच एक होऊन लढलो आहोत. अठरा पगड जातींचे लोक एकत्र येऊन, प्रत्येक स्तरावरचा माणूस एकत्र येऊन परकीय आक्रमकांना पळता भुई थोडी केली आहे. आपल्याला सर्जिकल स्ट्राईक, गनिमी कावा, स्त्री सुरक्षा, पेंशन योजना, शेतीचे ज्ञान, सुरक्षा आणि सुराज्य हे सगळेच शिवरायांनी दिले आहे. थोडक्यात वाढलेले पान समोर तयार आहे. आपल्याला फक्त ते पुरवून पुरवून खायचे आहे. त्या पुरवून खाण्याची ही दिवाळी आहे.

(शब्दांकन: स्वाती पेशवे)

आजकाल

# पालघर परिसरात वेडा राघूची वसाहत

**समीर मणियार**

दिवाळी सणाला आज सुरुवात झाली. प्रकाशाचा उत्सव म्हणून याला आपण महत्त्व देतो. आज धनतेरस अथवा धनत्रयोदशी. आजच्या दिवशी मी आणि माझी लाडकी कन्या सानिया आणि आंबेडकरी चळवळीतील माझे मित्र प्रा. गणेश प्रधान यांना अलभ्य लाभ झाला. सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळीच्या पालघर कॉलेजमधील काम आटोपून बाहेर पडलो. सानियाच्या म्हणण्यानुसार नवली फाटक परिसरातून जायचे ठरले. तितक्यात प्लॅन बदलला आणि मी व सानिया बाईकने कमारे वरखुंटी भागात निघालो. कमारे तलावाजवळ उजवीकडे भोगोले पाडा येथे जाणारा रस्ता उत्तम दिसला. तिकडे वळलो. परत येताना त्या भागात मुंबई अहमदाबादा हायस्पीड बुलेट ट्रेनच्या कामासाठी डेपो तयार होत असल्याचे नजरेस पडले. वनखात्याची जागा वनराईने नटलेली होती.

भोगोले पाडा येथून परत येताना आंबेडकरी चळवळीतील विदर्भातील माझे मित्र प्रा. गणेश प्रधान यांची गाठ पडली. ते चार दशकापासून या भागात वास्तव्यास आहे. त्यांच्या आग्रहावरुन वरकुंटी भागातील गुलाब पाडा भागातील राजगृह व्हिला दि फॅमिली रेस्ट हाऊसला भेट दिली. ते ठिकाण रमणीय व अप्रतिम आहे. बोलण्याचा नादात कमारे व्हॅलीचा विषय निघाला. सह्याद्री पर्वतराजीतील काळदुर्गाच्या पायथा असलेल्या कमारे व्हॅलीचा उल्लेख निघाला. नवली कमारे रोडवर गुलाब पाडा भागात कमारे व्हॅली हा नामांकित रिसॉर्ट आहे. कुतूहल म्हणून त्या रिसॉर्टकडे जाताना वेडा राघूचा थवा हा रस्त्यातील धूळमाती अंगाखांद्यावर उडविताना दिसला. शेजारच्या वीज वाहक तारांवर या पक्ष्याचा थवा दिसला. हा मनमोहक अप्रतिम नजारा पाहताना डोळे सुखावले. आणि धनत्रयोदशीला अलभ्य लाभ झाल्याचा अनुभव आला.हिरव्या रंगाचा हा छोटासा पक्षी आणि त्याची अदा पाहून आम्ही आश्चर्यचकित झालो. अधिक माहिती घेता आणि पक्षीतज्ञ डॉ. मारुती चितमपल्ली यांचा पक्षीकोश धांडाळून पाहता हा पक्षी वेडा राघू असल्याचे स्पष्ट झाले. वेडा राघू हा पक्षी किटक भक्षी आहे. इंग्रजीत याला लिटील ग्रीन बी इटर म्हणतात. याचे शास्त्रीय नाव मेरोप्स ओरीयंटलीस असे आहे. तो मुख्यतः फुलपाखरे, चतुर व इतर कीटक खातो. मधमाशा आवडीने खातो म्हणून हा पक्षी बी ईटर नावाने प्रसिद्ध आहे. उष्ण कटिबंधीय प्रदेशात हा सहज आढळतो. हा पक्षी आपल्या भागात सहज दिसत असला तरी गेल्या काही वर्षात याची संख्या कमी होत आहे. मातीचे वाढते प्रदूषण व अधिवास अवनती हे मुख्य कारण मानले जात आहे.

हिवाळ्यात थंडीपासून संरक्षण व्हावे या हेतूने हे पक्षी समूहाने घट्ट बिलगून एकत्र बसतात. सकाळी व सायंकाळी त्यांची मातीत आंघोळ (मड बाथ) करण्याची सवय वैशिष्ट्यपूर्ण आहे. वेडा राघु पक्ष्याला विजेच्या तारांवर बसने अत्यंत आवडते. तारेवर बसलेला असताना हा पक्षी मस्त घिरट्या मारतो. उडतांनाच हवेतल्या हवेत भक्ष्य पकडून पुन्हा तारेवर बसतो. मधमाश्या पकडण्यासाठी हा पक्षी हवेत वाकड्या तिकड्या घिरट्या मारतो. हवेतील मधमाशा आपल्याला दिसत नाही, मात्र या पक्ष्याला दिसतात. पाहणाऱ्याला वाटत की हा पक्षी उगाच घिरट्या मारतोय. वेडा झाला की काय? वाकड्या तिकड्या घिरट्या मारुन अतिशय शिताफीने मधमाशी पकडतांना तो भांबावून जातो. म्हणून तो परत त्याच जागी येऊन बसत असल्याने याच नामकरण 'वेडा राघू' अस झाले आहे. वाकड्या तिकड्या घिरट्या मारणे, भांबावून परत परत त्याच जागी बसने, दिसायला पोपटाच्या हिरव्या रंगाचा असणे, त्यामुळे याच नाव वेडा राघू पडले असावे. निसर्गात कीड नियंत्रण अतिशय महत्वाचे असून अन्नसाखळीच संतुलन पक्षी ठेवतात. किटकांची संख्या नियंत्रित राहिली तरच हे निसर्गचक्र सुरळीत चालणार आहे. वेडा राघूसारखे पक्षी हे पर्यावरण संतुलनाचे खरे शिलेदार आहेत. किटकांच्या संख्येवर मोफत नियंत्रण ठेवणारे वेडे राघू पक्षी वास्तविकता निसर्गचक्रात अतिशय महत्वाचे आहे. त्यांचे अस्तित्व हे मानवाच्या अस्तित्वाच्या दृष्टीने फायद्याचे आहे.

वेडा राघू व सर्वच पक्ष्यांचे योगदान आहे. पक्षी हे शेतकऱ्यांचे मित्र, वनस्पतींचे बीजप्रसारण, निसर्गाचे सफाई कामगार व अन्नसाखळीचे संतुलन अशा अनेक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. मानव निसर्गाला प्रचंड हानी पोहोचवून जीवन जगतोय, तर वेडा राघू निसर्गासोबत सहजीवन साधतो आहे. निसर्गात अतिशय महत्वाचा असलेल्या या पक्ष्याचे नाव आपण वेडा राघू' ठेऊन मोकळे झालो. मात्र खरा वेडा कोण? आपण की हा राघू असा प्रश्न पडतो.

शरीर सडपातळ व सुमारे २३ सेंटीमीटर लांब असते. याच्या शरीराचा रंग हिरवा असतो, डोके व मान यांवर सोनेरी तपकिरी आणि हनुवटी व गळा यांवर निळी छटा असते. गळ्यावर आडवा काळा पट्टा असतो. चोच लांब, बारीक, काळी आणि थोडी बाकदार असते. तिच्या बुडापासून काळा पट्टा निघून डोळ्यांच्या मागे जातो. डोळे लाल-भडक आणि पाय शिशासारख्या काळसर रंगाचे असतात. शेपटी लांब असून तिच्या मध्यावरची दोन पिसे जास्त लांब, शेपटीच्या बाहेर आलेली आणि सळईसारखी असतात. नर आणि मादी दिसण्यात सारखीच असतात. यांची जोडपी किंवा लहान थवे असतात. खुल्या मैदानी प्रदेशांत म्हणजे शेते, पडीक जमीन, बागा, जंगलातील उघड्या जागा यांच्या जवळपास राहणारा हा पक्षी आहे. झाडांच्या पुढे आलेल्या उघडया फाद्यांवर हा पुष्कळदा बसलेला दिसतो परंतु याची बसण्याची आवडती जागा म्हणजे तारायंत्राच्या आणि दूरध्वनीच्या तारा होत. या तारांवर ते नेहमी ओळीने बसलेले दिसतात. या ठिकाणी बसून ते भक्ष्याची टेहळणी करीत असतात. उडत असलेली एखादी माशी किंवा किडा टिपतात.

पंख असलेल्या किडयांवरच हा उदरनिर्वाह करतो. याचा आवाज साधारण मोठा मंजुळ असतो. तिन्हीसांजेच्या सुमारास दीडशे-दोनशे वेडे राघू गर्द पालवी असलेल्या एखाद्या झाडावर जमून खूप गोंगाट करतात आणि अंधार पडल्यावर तेथेच गुपचूप झोपी जातात. अस्वस्थता व उगाचच उडया मारण्याच्या प्रवृत्तीमुळे याला वेडा राघू हे नाव पडले असावे. राजकारणात खासकरुन विधानसभेच्या निवडणूक आखाड्यात बरेच पोपट मिठू मिठू बोलत मतदारांची करमणूक करताना दिसत आहेत. राजकीय पोपट ही स्वार्थी असतात. त्यातुलनेत पर्यावरण संरक्षण, निसर्ग संतुलन या कामात अनमोल महत्वाची भूमिका बजावणारे वेडा राघू ग्रेट आहेत. आपण उघड्या आणि डोळस नजरेने पाहिले की आपणास वेडे राघू हे नजरेस पडतील. सध्या वेडे राघूंचे थवे की जत्थे हे सफाळे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वरखुंटीच्या गुलाब पाडा परिसरात आहेत. त्यांच्या दर्शनाचा अलभ्य लाभ आपणासही घेता येईल. त्यासाठी आपण सवड काढण्याची गरज आहे.

लोकसंसद

## मराठी पाऊल पडते पुढे

जगभरात अनेक मराठी माणसांनी समस्त मराठी मनाला अभिमान वाटेल अशी उत्तुंग कामगिरी केली आहे. त्यात जगभरात स्थायिक झालेल्या अनेक मराठी व्यक्तींचा समावेश आहे. अमेरिकेच्या मिशिगन राज्याचे सिनेटर म्हणून निवडून आलेले श्री ठाणेदार, जगविख्यात हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या अधिष्ठातापदी निवड झालेले श्रीकांत दातार, संयुक्त अरब अमिरातीमधील मसाल्याचे जगप्रसिद्ध व्यापारी धनंजय दातार, आयर्लंडचे पंतप्रधानपद भूषवलेले लिओ वराडकर ही काही प्रतिष्ठित नावे, तर प्रतिष्ठेचा ७ कोटींचा 'ग्लोबल टीचर पुरस्कार' मिळवणारे सोलापुरातील शिक्षक रणजित डिसले आणि आंतरराष्ट्रीय फेलोशिप सन्मानित भारत सरकारचे राष्ट्रीय विज्ञानचे अध्यक्ष कोल्हापूरचे प्रा. गणपती यादव ही आणखी काही नावे. मराठीचा झेंडा आंतरराष्ट्रीय स्तरावर फडवणाऱ्या अशा अनेक व्यक्तींच्या यादीत आता दोन नावांची भर पडली आहे. तेल आणि वंगण उत्पादन करणाऱ्या दोन बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये दोन मराठी माणसांची उच्चपदावर नेमणूक झाली आहे. कॅस्ट्रॉल इंडिया या बहुराष्ट्रीय कंपनीने व्यवस्थापकीय संचालकपदी केदार लेले यांची नियुक्ती केली आहे तर गल्फ ऑइल लुब्रिकंटस इंडिया लिमिटेड या कंपनीने मुख्य व्यावसायिक अधिकारी (सीईओ) म्हणून अभिजीत कुलकर्णी यांची नेमणूक केली आहे. या दोघांचे अभिनंदन आणि मराठी माणसाचा डंका यापुढेही जगात असाच वाजत राहो हीच अपेक्षा!

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१ नोव्हेंबर**

**१८७१:-** मासिक मनोरंजनचे संपादक, अनुवादक काशीनाथ रघुनाथ मित्र यांचा जन्म. **१८८८ :-** लेखक पुरुषोत्तम श्रीपत काळे यांचा जन्म. त्यांनी लिहिलेल्या 'ललितकलेच्या सहवासात' या पुस्तकातून नाटकमंडळीच्या सहवासातील अनुभव कथन केले. तर 'रंगभुमीवरील नेपथ्य' या पुस्तकातून नेपथ्य हा नाट्यव्यवसायाशी निगडीत असणारा तांत्रिक विषय सर्वसामान्यांना समजेल, अशा सोप्या भाषेत लिहिला आहे. **१९०१ :-** लेखक डॉ. रामचंद्र नारायण चौधरी यांचा जन्म. पेशाने डॉक्टर पण ह्यांनी ममाझी वैद्यकीय व्यवसायातील पंचवीस वर्षे या आत्मचरित्रासह 'ज्ञानेश्वरी पद्मपराग' हा ग्रंथ लिहिला. **१९१५ :** विदर्भ लेखक संघाचे संस्थापक प्रा. श्रीकृष्ण विठ्ठल गंधे यांचा जन्म. ह्यांचे 'आमचं ऐका', 'कांतावन्स' ह्या एकांकिका, 'कागदी विमाने' हा बालकथा संग्रह, तसेच 'क्रीडांगणावर', 'खो खो' ही खेळाविषयक पुस्तके आणि तीन नाटिका, 'भावना' ही कथा, 'शारीरिक शिक्षण : शास्त्र आणि परिचय', 'स्त्रियांचे व्यायाम आणि खेळ' ह्या ग्रंथाशिवाय 'शारीरिक शिक्षण', 'योगप्रसाद' या मासिकाचे संपादन त्यांनी केले. **१९१८ :-** ख्यातनाम विनोदी अभिनेते शरद तळवलकर यांचा जन्म. जन्माचे, 'शरदहास्य', 'मी रंगविलेले म्हातारे' ही पुस्तके प्रसिध्द .'नाटक झाले. **१९२२ :-** कवी कृष्णाजी पांडुरंग लिमये तथा राधारमण यांचे निधन. भारवी व मोरोपंताचा प्रभाव त्यांच्या कवितेवर असल्याने त्यांची कविता दीर्घ आणि कथात्मक झाली. याची प्रचिती 'राधामरण' या कवितेतून येते. त्यांची 'कालचक्र' ही कविता कालिदासाच्या 'ऋतूसंहारां'ची आठवण करुन देते. नाना फडणीसांवर 'फडणीस काव्य' हे तर लो. टिळकांवर मोरोपंताचा प्रभुद्रोह आणि 'आर्य माता विलाप' हे काव्य रचले. 'महाराष्ट्र वीरदर्शन' या काव्यात मराठ्यांच्या शौर्याचे तर भारवीच्या किरातार्जुनीया च्या पाच रागांचे भाषांतर केले. **१९२६ :-** गीतकार, संगीतकार, गायक आणि या विषयावरील एक प्रतिभासंपन्न लेखक कवी यशवंत देव यांचा जन्म. त्यांच्या प्रकाशित ग्रंथ संपदेत 'चार लोचनांची दुनिया' हा मराठी भावगीत संग्रह 'साई गीत प्रसाद' ही साईबाबा चरित्र गीते, 'शब्दप्रधान गायकी' सुगम संगीत विवेचनात्मक ग्रंथ (राज्य पुरस्कार प्राप्त), 'पत्नीची मुजोरी' ही विडंबन गीते, विनोदी कविता तसेच 'रियाजाचा कानमंत्र' हे स्वरांचा प्रभावशाली आविष्कार कसा करावा याचे मार्गदर्शन तर 'करुणा त्यांची' ओशो रजनीश यांच्या विचारावर अनुभवजन्य शंभर रुबाया, 'या रे सारे गाऊया' ही बालांसाठी गाणी, 'कृतज्ञतेच्या सरी' ही विशेष व्यक्तिविषयी काव्यपंक्ती, 'कधी बहर कधी शिशिर' हे आत्मचरित्र प्रसिध्द याशिवाय मगाणारे शब्द (कविता-गीते - संग्रह), 'जिथे गाभारा तिथेच कळस' (मराठी), ध्यानानुभवावर आधारित १०० रुबाया, 'अस्तित्व की करुणा अध्यात्मिक रुबाया', 'स्वानुभव हाच सद्गुरु' ही अलिकडे प्रकाशित झालेली पुस्तके. **१९३० :-** लेखक, कवी दत्तात्रय नागेशराव जोशी यांचा जन्म. 'पंचविशी' हा काव्यसंग्रही त्यांचा प्रकाशित झाला आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ नोव्हेंबर

१) श्रीम. सुमित्रा नामणा नायक वरसोली, अलिबाग, १-११-१९४९
२) श्री. मारूती गजानन पाटील शहापूर, अलिबाग, १-११-१९३६
३) श्री. रोहिदास कृष्ण म्हात्रे आवास, अलिबाग, १-११-१९४०
४) श्री. रघुनाथ बापू म्हात्रे श्रीबाग, अलिबाग, १-११-१९५१
५) श्रीम. शैलजा गुरूनाथ बांदेकर पंतनगर, अलिबाग, १-११-१९५१
६) श्री. शंकर बाळकृष्ण पाटील कुरूळ, १-११-१९४५
७)श्री. सुरेश परशुराम पौडवाल अलिबाग, १-११-१९५२

# भातशेतीसह नाचणी पिकही धोक्यात

## नांदगाव परिसरात मुसळधारः कापणी केलेले पिक भिजल्याने नुकसान

**। नांदगाव । प्रतिनिधी ।**

**पाऊस काही थांबण्याचे नाव घेत नसून नांदगाव परिसरात जोरदार हजेरी लावली. हळव्या भातशेतीला फटका बसल्यानंतर आता या पावसाने नाचणी पिकही धोक्यात आले आहे. परिसरात कापणी केलेले भात पिकाचेही नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त बनले आहेत.**



यावर्षी पावसाला एकमिरगी सुरवात झाली होती. रोप लावणीला कुणाचीही पावसाने अडवणूक केली नाही, पाणी अडवून किंवा शिंपून लावणी करण्याची वेळ आली नाही. शेतकरी समाधानी होता. पण, पीक पदरात घेण्याची वेळ आली तेव्हा थांबण्याची गरज होती पण तो काही थांबण्याचे नाव घेत नसल्याने शेतकऱ्यांना नुकसानीस समोरे जावे लागत आहे.

हळव्या भातशेतीला फटका बसल्यानंतरही नाचणी पिकही धोक्यात आले आहे. परिसरात कापणी केलेले भात पिकाचेही नुकसान झाले आहे. कापलेले भात पीक मळ्यातील पाण्यातच आडवे पडून आहे. त्यामुळे काही ठिकाणी भाताला कोंब आल्याचेही चित्र आहे. शिवाय विजेच्या गडगडाटामुळे अनेक भागात विद्युत उपकरणे जळून नुकसान झाले आहे. पडझड झाल्याने घरे, गोठे, झाडे कोसळली तर काही ठिकाणी जिवीतास धोकाही निर्माण झाला. म ागील महिनाभर नागरिक दुपारी तीन नंतर दरवाजा खिडक्या बंद करून स्वतःला विजेच्या धोक्याला घाबरून कोंडून घेत आहेत.

अनेक ठिकाणी तर एकवेळ पावसाने बुडवले तरी चालेल पण विजेचा कडकडाट व लोळ यापासून अधिक भीती वाटते, असे ऐकायला मिळत आहे. अनेक ठिकाणी विज अंगावर पडून जीवितहानीच्या घटनाही घडल्या आहेत. सध्या सकाळी ऊन, दुपारनंतर पाऊस आणि पहाटे धुके अशी स्थिती पहावयास मिळत आहे. त्यामुळे शेतीसह बागायतींचेही नुकसान होत आहे.

### महावितरणला फटका

**गेल्या काही महिन्यांपासून सुरु असलेल्या विजेचा गडगडाट, वादळी वारे, जोरदार पाऊस यामुळे महावितरणचे मोठे नुकसान झाले आहे. दुपारनंतर रोज लाईट जाण्याच्या प्रकाराने विज ग्राहक हैराण झाले आहेत. दोन-दोन दिवस सलग विद्युत पुरवठा खंडित प्रकाराने वीज अधिकारी व ग्राहकांमध्ये वाद निर्माण होत आहेत.**

# बोईसरमध्ये अज्ञात वस्तूचा स्फोट; चार जण जखमी

**। बोईसर । वृत्तसंस्था ।**

बोईसरजवळील सरावली अवध नगर येथील चाळीत रात्री उशिरा एका अज्ञात वस्तूचा स्फोट होऊन परिसर हादरला. या स्फोटात चार जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्फोटाची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपासाला सुरुवात केली आहे.

बोईसर जवळील सरावली ग्रामपंचायत हद्दीमधील अवध नगर परिसरात असलेल्या अलशिफा गल्लीतील दुबे चाळीमधील एका खोलीत बुधवारी रात्री अकरा वाजेच्या सुमारास भीषण स्फोट झाला. या स्फोटामुळे खोलीच्या भिंती कोसळल्या असून आजूबाजूच्या घरांचे देखील नुकसान झाले आहे.

स्फोटाची माहिती मिळताच बोईसर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमी झालेल्या चार जणांना रुग्णालयात हलवले. सुरुवातीला हा स्फोट सिलेंडरमुळे झाल्याचा संशय होता, मात्र अधिक तपासात खोलीतील कपाटातील संशयास्पद वस्तू किंवा फ्रिजच्या कॉम्प्रेसरचा स्फोट झाल्याचे प्रथमदर्शनी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

त्या दृष्टीने रात्री उशिरा घटनास्थळी वरीष्ठ पोलीस अधिकारी यांनी भेट देऊन पाहणी करून अधिक तपासासाठी फॉरेन्सिक टिमला पाचारण करण्यात आले आहे.बोईसरमधील अवधनगर परिसर हा संवेदनशील मानला जात असून विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गजबजलेल्या ठिकाणी संशयास्पद स्फोट झाल्याने खळबळ माजली आहे.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# हातखंबा, चांदेराई येथे आशा सेविकांना मार्गदर्शन

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

येथील वीरश्री ट्रस्ट आणि धन्वंतरी रुग्णालयातील रत्नागिरी टेस्ट ट्यूब बेबी सेंटरच्या माध्यमातून हातखंबा प्राथमिक आरोग्यकेंद्र आणि चांदेराई प्राथमिक आरोग्यकेंद्रात आशा सेविकांचे मार्गदर्शन शिबिर झाले. या वेळेला आशा सेविकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

वीरश्री ट्रस्ट आणि धन्वंतरी रुग्णालय सातत्याने रत्नागिरीतील आरोग्यविषयक क्षेत्रामध्ये काम करत आहे. याचाच एक भाग म्हणून गावातल्या घराघरात पोहोचणाऱ्या आशा सेविकांना आरोग्यविषयक अत्याधुनिक माहिती देण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले. या वेळी हातखंबा प्राथमिक आरोग्यकेंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियांका माने, आरोग्य सहाय्यक झोरे, आरोग्य सहाय्यिका देसाई, आशा पवार, गटप्रवर्तक तन्वी बोरकर आणि सायली शेट्ये उपस्थित होते.

आशा सेविकांना विविध विषयांवर त्यातही वंध्यत्व या विषयावर आवर्जून मार्गदर्शन करण्यात आले. आशा सेविका या ग्रामीण भागातील घराघरातल्या आरोग्यक्षेत्राच्या दुवा आहेत. तेथील ज्येष्ठ नागरिक, मुलं आणि विशेषतः महिलांच्या आरोग्याची काळजी या आशा सेविका घेत असतात. त्यामुळे त्यांचे या समाजातले स्थान महत्वाचे आहे, असे सांगण्यात आले. चांदेराई प्राथमिक आरोग्यकेंद्र येथे सुद्धा आशा सेविका मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. शीतल सूर्यवंशी आणि गटप्रवर्तक एच. डी. इंदुलकर उपस्थित होते.

## छतावरून पडून तरुणाचा मृत्यू

**रत्नागिरी :** शहराजवळील मिरजोळे-एमआयडीसी येथील एका कंपनीच्या छतावरून पडून तरुणाचा मृत्यू झाला. ग्रामीण पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अभिजित आत्माराम शेलार असे मृताचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अभिजित हा काल सकाळी मिरजोळे-एमआयडीसी येथील एका कंपनीत कामाला गेला होता. कंपनीच्या छतावर काम करत असताना अचानक पत्रा तुटल्याने तो खाली पडला. यामध्ये त्याला गंभीर दुखापत झाली. उपचारांसाठी खासगी रुग्णालयात दाखल केले होते. उपचारांदरम्यान त्याचा मृत्यू झाला.

# अर्ज छाननीवेळी महायुती-ठाकरे शिवसेना भिडली

**। कुडाळ । वृत्तसंस्था ।**

येथे विधानसभा उमेदवार अर्ज छाननी प्रक्रिया शांतपणे सुरू असतानाच कुडाळ-मालवण मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयाखाली तहसीलच्या प्रवेशद्वारावर महायुती आणि ठाकरे शिवसेनेचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले.

दोन्हीकडच्या कार्यकर्त्यांत खडाजंगी झाली. दोन्ही गटांतील समजूतदार पदाधिकाऱ्यांनी हे प्रकरण शांत केले. त्यानंतर पोलिस घटनास्थळी आले. त्यांनी सर्व कार्यकर्त्यांना बाहेर काढले. यामुळे काहीकाळ वातावरण तंग झाले होते.

कुडाळ -मालवण मतदारसंघाच्या अर्ज सुनावणीवेळी एका अपक्ष उमेदवाराच्या अर्जाला आक्षेप घेण्यात आला. त्या उमेदवाराच्या एका सूचकाची सही खोटी मारल्याचा आक्षेप होता. त्याने ती सही आपली नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे, असे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सांगितले.


### कार्यकर्त्यांमध्ये जोरदार खडाजंगी

त्यासाठी त्यांनी एक तासाचा वेळा दिला. त्याप्रमाणे ते प्रतिज्ञापत्र करण्यासाठी संबंधित सूचक तहसील कार्यालयात आले असता महायुतीच्या एका कार्यकर्त्याने त्याला आत जाण्यास विरोध करीत अडवीत धक्काबुक्की केली. यावेळी बाहेर थांबलेल्या ठाकरे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी आत येत त्या कार्यकर्त्याला जाब विचारला. दरम्यान, काही कार्यकर्ते त्या सूचकला घेऊन प्रांत कार्यालयात गेले. यावेळी प्रांत कार्यालयाच्या मुख्य दरवाजातच दोन्ही गट एकमेकांना भिडले. तेथे पोलीस नव्हते. काही वेळाने पोलीस आले. मोठा आरडाओरडा ऐकून निवडणूक निर्णय अधिकारी ऐश्वर्या काळुशेदेखील चेंबर सोडून तेथे आल्या. दरम्यान, पोलिसांनी सर्वांना बाहेर काढले. त्यानंतर मात्र तहसील कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# शिवचैतन्य सोहळ्याने उजळला दुर्गराज किल्ले रायगड

**। कुडाळ । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या शेकडो मावळ्यांनी वसुबारसच्या मुहुर्तावर किल्ले रायगडावर पहिला दिवा छत्रपती शिवरायांना अर्पण करत दिवाळीची जल्लोषात सुरुवात केली.



श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती, दुर्गराज रायगड संस्थेच्यावतीने सलग १३ व्या वर्षी शिवचैतन्य सोहळा साजरा केल्याची माहिती समितीचे अध्यक्ष सुनील पवार यांनी दिली.

सोलापूर व पुणे येथील छोट्या शिलेदारांनी मशालींच्या प्रकाशात लाठीकाठी आणि तलवारबाजीचे चित्त-थरारक सादरीकरण केले. बोरिवलीतील मावळ्यांच्या पारंपरिक ढोल-ताशा पथकाने सर्वांना मंत्रमुग्ध केले.

दिवाळीचा पहिला दिवा महाराजांच्या चरणी आणि त्यानंतर आपल्या घरी, असा निश्चय करून राज्याच्या कानाकोपऱ्यातील शिवभक्तांनी किल्ले रायगडावर दीपोत्सव साजरा करून छत्रपती शिवरायांना मानवंदना दिली.

गडदेवता शिरकाई, श्री जगदिश्वर, हिंदवी स्वराज्याचे सार्वभौम सिंहासन यांचे पूजन केले. समितीचे संस्थापक-सदस्य संजय ढमाळ यजमान होते.

## फिनोलेक्सच्या चौघांची टेक्निमाँट कंपनीत निवड

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**


फिनोलेक्स ॲकॅडमी ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजीमधील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील चार विद्यार्थ्यांची टेक्निमाँट या कंपनीत नोकरीसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांमध्ये मिसबा काझी, आदिती श्रोत्री, जयेश पार्टे, निनाद ताम्हणकर यांचा समावेश आहे. ऊर्जा, पेट्रोकेमिकल्स, इन्फ्रास्ट्रक्चर आणि केमिकल्स या क्षेत्रांत विशेष ओळ-खली जाते. भारतातील प्रमुख प्रकल्पांमध्ये भागीदारी करत असलेल्या या कंपनीच्या विविध शाखा कार्यरत आहेत. कंपनीच्या उच्च दर्जाच्या तांत्रिक सेवेमुळे आणि जगभरातील प्रकल्पांमध्ये सहभागामुळे टेक्निमाँट विद्यार्थ्यांसाठी एक आकर्षक करिअरची संधी ठरली आहे. या यशाबद्दल फिनोलेक्स ॲकॅडमीच्या अध्यक्षा डॉ. अरूणा कटारा, अमृता कटारा, डॉ. कौशल प्रसाद आणि सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# फळबाग लागवडीवर १३ कोटींचा खर्च

## मनरेगा योजना; २२८५ हेक्टर क्षेत्रावर लागवड

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

कृषी अधिकारी कार्यालयामार्फत गत सहा वर्षांत राबवण्यात आलेल्या महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवडीसाठी १२ कोटी ८४ लाखांहून अधिक निधी खर्ची पडला आहे.शासनाकडून थेट बँक खात्यात मजुरी जमा झाल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली आहे.



गत सहा वर्षांत तालुक्यातील दीडशेहून अधिक गावांमधील २२८५.७५ हेक्टर क्षेत्रांवर आंबा, काजू, नारळ, चिकू, साग आदी वृक्षरोपांची लागवड करण्यात आली. यासाठी ३५२८ मजुरांना ११ कोटी ८४ लाख १ हजार ८७९ रुपयांचा शासनाचा निधी खर्ची पडला.२०१८-१९ मध्ये ४३४.८० हेक्टर क्षेत्रांवर ६१९ मजुरांनी लागवड केली. यासाठी १ कोटी ८० लाख ४६ हजार २६ रुपयांचा निधी खर्ची पडला. २०१९-२० मध्ये ७४९ मजुरांनी ५६१.९५ हेक्टर क्षेत्रांवर लागवड केली. यासाठी २ लाख २५ हजार ३३९ रुपये खर्ची पडले.

२०२०-२१ मध्ये ३८१.४५ हेक्टर क्षेत्रांवर ६२९ लाभार्थी मजुरांनी लागवड केली. यासाठी १ कोटी ७२ लाख ७४५ रुपये खर्ची पडले. २०२१-२२ मध्ये ५९५ मजुरांनी ३५६.२५ हेक्टर क्षेत्रांवर लागवड केली. यासाठी २ कोटी ८४ लाख ८७ हजार २३८ रुपयांचा निधी खर्ची पडला. २०२२-२३ मध्ये २६०.७० हेक्टर क्षेत्रांवर ४२४ मजुरांनी लागवड केली. यासाठी १ कोटी ६९ लाख ८ हजार ८३६ रुपयांचा निधी खर्ची पडला. २०२३-२४ आर्थिक वर्षात २६ डिसेंबरअखेर ५१२ लाभार्थी मजुरांनी २९०.६० हेक्टर क्षेत्रावर लागवड केली. त्यासाठी १ कोटी ४२ लाख ३३ हजार ६९५ रुपयांचा निधी खर्ची पडला.

# नामसाधर्म्य असलेल्या उमेदवारांची परंपरा सुरू

**। दापोली । वृत्तसंस्था ।**

दापोली विधानसभा मतदार संघात नामसाधर्म्य असलेल्या उमेदवारांची परंपरा याही वर्षी अबाधित आहे. राजकारणात प्रतिस्पर्धी उमेदवाराला नामोहरम करण्यासाठी विविध डावपेच आखले जातात. प्रतिस्पर्धी उमेदवाराबाबत संभ्रम निर्माण करण्यासाठी उमेदवाराच्या नावाशी, आडनावाशी साम्य असलेल्या व्यक्तीला निवडणुकीच्या रिंगणात उतरवणे हा त्यातील एक. या नामसाधर्म्याचा फटका प्रमुख राजकीय पक्ष असलेल्या उमेदवाराला बसत असून, त्यामुळे मतदारांचाही गोंधळ उडणार आहे.

शिवसेनेचे उमेदवार योगेश रामदास कदम यांनी २४ व २८ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल केला असून, योगेश कदम व योगेश कदम या नामसाधर्म्य असलेल्या दोन उमेदवारांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अपक्ष उमेदवार कदम योगेश रामदास हे कात्रप, बदलापूर जिल्हा ठाणे येथील रहिवासी असून, कदम योगेश विठ्ठल हे खेड तालुक्यातील नांदिवली येथील रहिवासी आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार कदम संजय वसंत यांनी २४ व २९ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल केले असून, कदम संजय व कदम संजय या नामसाधर्म्य असलेल्या दोन उमेदवारांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अपक्ष उमेदवार कदम संजय हे खेड तालुक्यातील नांदिवली केळेवाडी येथील रहिवासी असून, कदम संजय सीताराम हेही हुंबरी खालची या गावचे रहिवासी आहेत. नामसाधर्म्य असलेल्या या उमेदवारांनी अर्ज मागे न घेतल्यास शिवसेनेचे योगेश कदम व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कदम संजय यांची डोकेदुखी वाढणार आहे.

## नोव्हेंबरमधील लोकशाही दिन रद्द

**रत्नागिरी :** जिल्हास्तरावर दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय लोकशाही दिन होतो; परंतु विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागू आहे. अशा ठिकाणी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येऊ नये, अशा सूचना आहेत. त्यानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची आचारसंहिता लागू आहे. त्यामुळे नोव्हेंबर महिन्यातील लोकशाही दिन रद्द केला आहे.

# तलासरी पोलीस ठाणे हद्दीत ४ कोटी ३३ लाखांची रक्कम जप्त

**डहाणू :** तलासरी तालुक्यातील उधवा आंतरराज्यीय सीमेवर दुपारच्या सुमारास तलासरी पोलिसांनी वाहनामध्ये मोठी रक्कम घेऊन जाणारे एक वाहन जप्त केले आहे. वाहनामध्ये ४ कोटी ३३ लाख रुपये असल्याची प्राथमिक माहिती देण्यात येत आहे.

तलासरी पोलीस ठाणे हद्दीत विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस तपासणी करत असताना दादरा नगर हवेली येथून उधवा बाजूला येणाऱ्या एका वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात पैसे आढळून आले आहेत. सध्या वाहनासह वाहनातील सहा जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांनी दिलेल्या माहिती नुसार एका नामांकित बँकेच्या एटीएम मध्ये पैसे टाकण्यासाठी पैसे नेले जात असल्याची प्राथमिक माहिती देण्यात येत आहे. जप्त केलेल्या वाहनातील कर्मचाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार सध्या तपास सुरू असून रोकड तपासणी सुरू आहे. याविषयी निवडणूक आयोगाच्या यंत्रणेला माहिती देण्यात आली असून चौकशीनंतर योग्य ती माहिती समोर येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

# ‘कोरे’चा वेग १ नोव्हेंबरपासून वाढणार

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

कोकण रेल्वेमार्गावरून धावणाऱ्या रेल्वेगाड्यांचे पावसाळी वेळापत्रक ३१ ऑक्टोबरपासून संपुष्टात येणार आहे. १० जूनपासून कोकण रेल्वेमार्गावरून धावणाऱ्या गाड्यांचा वेग मंदावला होता. त्यामुळे प्रवाशांना विलंबाचा प्रवास करावा लागत होता; मात्र १ नोव्हेंबरपासून रेल्वेगाड्यांचा वेग वाढणार असून, विलंबाच्या प्रवासातून प्रवाशांची सुटका होणार आहे.

कोकण मार्गावर पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या अडथळ्यांवर मात करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने गस्तीसाठी ६७५ रेल्वे कर्मचाऱ्यांची कुमक तैनात केली होती. असुरक्षित ठिकाणी २४ तास जागता पहाराही ठेवला होता. तीन ठिकाणी २४ तास नियंत्रण कक्षही कार्यान्वित केले होते. १० जूनपासून रोह्यापासून ठोकूरपर्यंत ताशी ७५च्या वेगाने रेल्वेगाड्या धावत आहेत. वीर ते कणकवली ताशी ७५, कणकवली ते मडगाव ताशी ९०, मडगाव ते कुमठा ताशी ७५, कुमठ्यापासून उडपीपर्यंत ताशी ९० असा रेल्वेगाड्यांचा वेग आहे.

नेत्रावतीसह ‘दिवा-सावंतवाडी’च्या वेळेत १ नोव्हेंबरपासून बदल होणार आहे. १६३४५ क्रमाकांची नेत्रावती एक्स्प्रेसच्या वेळेत १ नोव्हेंबरपासून काहीसा बदल करण्यात आला आहे. १०१०५ क्रमांकाची दिवा-सावंतवाडी एक्स्प्रेस पावसाळी वेळापत्रकाच्या तुलनेत २० मिनिटे आधी म्हणजे दुपारी २ वाजून ५ मिनिटांनी रत्नागिरी स्थानकात दाखल होईल. पावसाळी वेळापत्रकानुसार सद्यःस्थितीत दुपारी २ वाजून २५ मिनिटांनी येत होती. या पाठोपाठच सावंतवाडी ते दिवादरम्यान धावणाऱ्या एक्स्प्रेसच्या वेळेतही बदल केला आहे.

# उत्पादन शुल्कचे २५ ठिकाणी छापे

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याआधीच राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध मद्यसाठ्यावर करडी नजर आहे; परंतु आचारसंहिता लागू झाल्यापासून १५ ऑक्टोबरपासून कडक कारवाई करत गेल्या पंधरा दिवसांमध्ये अवैध मद्यसाठ्याविरोधात २५ गुन्हे दाखल करून ४ लाख ४१ हजार ११० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. २१ जणांना अटक करण्यात आली आहे.




राज्य उत्पादन शुल्क विभागाची ४ पथके नेमण्यात आली आहेत. परराज्यातील मद्याची अवैध वाहतूक रोखणे, रात्रीची गस्त, संशयित वाहनांची तपासणी तसचे अवैध दारूधंद्यांना प्रतिबंध करण्याच्या सूचना सर्व पथकांना देण्यात आल्या आहेत. या विभागाने आचारसंहिता सुरू होण्यापूर्वीच १ ते १४ ऑक्टोबर या कालावधीतही अवैध मद्यावर कारवाईचा बडगा उगारला होता. या काळातील कारवाईत ८० गुन्हे दाखल झाले असून, १५ लाख ४४ हजार ४१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. १५ ऑक्टोबरपासून मोहीम तीव्र करण्यात आली. आठ ते दहा दिवसांमध्ये अवैध मद्याविरोधात २५ गुन्हे दाखल करून ४ लाख ४१ हजार ११० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ९ हजार ६०५ लिटर रसायन नष्ट करण्यात आले.

> **आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी विभागाने अवैध मद्याविरोधातील मोहीम अधिक तीव्र केली असून जिल्ह्यात येणाऱ्या वाहनांची प्रमुख ठिकाणी कसून तपासणी करण्यात येत आहे.**
>
> **– कीर्ती शेडगे, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.**

### दृष्टिक्षेपात

**देशी : १५.६६ बल्क लिटर**
**गोवा मद्य : ४१.२२ बल्क लिटर**
**विदेशी मद्य : ४.८६**
**नष्ट रसायन : ९,६०५ लिटर**

# रायगडातील मतदारांची मतदानाकडे पाठ

। पाली/बेणसे । वार्ताहर ।
राज्यात सर्वत्रच विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. रायगड जिल्ह्यात सात विधानसभा मतदारसंघात सार्वत्रिक निवडणुकीची मतदान प्रक्रिया २० नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. मात्र, मागील दोन निवडणुकीच्या तुलनेत २०१९ च्या निवडणुकीत मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवल्याचे चित्र होते. यावेळी जिल्ह्यात ६५.८६ टक्के मतदान झाले होते. २०१४ च्या निवडणुकीपेक्षा ४.३९ टक्क्यांची तफावत दिसून आली. यामुळे प्रशासनाकडे मतदानाचा टक्का वाढवण्याचे आवाहन आहे.

## ■ प्रशासनाला टक्का वाढवण्याचे आवाहन



मागील २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मतदारांचा प्रतिसाद कमी झाल्याचे दिसून आले होते. ही बाब चिंताजनक आहे. २० नोव्हेंबर रोजी दिग्गज उमेदवारांच्या राजकीय भवितव्याचा फैसला होणार आहे. मतदानाचा घसरलेला टक्का कुणाच्या पथ्यावर पडेल, हे देखील तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. यामुळे निवडणुकी आधी जिल्हा प्रशासनाकडून मतांची टक्केवारी वाढविण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाने जनजागृती होत आहे. ठिकठिकाणी जनजागृती, प्रभात फेऱ्या, मतदान जागृती कार्यक्रम, पथनाट्य असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. प्रसिद्धी माध्यम, जाहिरात, पथनाट्य, बॅनरबाजी या मार्गाने मतदारांना मतदान करण्याचे आवाहन देखील करण्यात येत आहे. शाळा, महाविद्यालय, आरोग्य केंद्र, महसूल प्रशासन यांच्यामार्फत देखील मतदार जनजागृती करण्यात येत आहे. वेळोवेळी राजकीय पक्षांनीही मतदारांना जास्तीत जास्त मतदान करण्याचे आवाहन केले होते. मात्र, हे प्रयत्न देखील अपुरे पडत असलेले दिसत आहेत.

### लाडक्या बहिणींवर मदार

मतदारांचा प्रतिसाद कमी झाल्याने २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत सातही विधानसभा मतदारसंघात ६५.८६ टक्के मतदान झाले होते. यावेळी जिल्ह्यात पुरुष मतदारांचा टक्का वाढलेला होता. मात्र, महिलांचा मतदानाचा घसरलेला टक्का चिंताजनक आहे. यंदा लाडकी बहीण योजना राबविण्यात आली आहे. यामुळे या लाडक्या बहिणी मतदानासाठी बाहेर पडतील अशी अपेक्षा आहे.

### मतदानाकडे पाठ

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ३५ टक्के मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवली होती. यावेळी जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघात २२ लाख ६६ हजार ६७९ मतदार होते. २७१४ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया घेण्यात आली. ७ लाख ८२ हजार ५८० पुरुष मतदार, ७ लाख १३ हजार ७८२ महिला मतदार आणि एक तृतीयपंथी असे एकूण १४ लाख ९६ हजार ३६३ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. २०१४ च्या तुलनेत या मतदारसंघांमध्ये पनवेल १२.६, कर्जत ४.४५, उरण ३.३५, पेण ०.१६, अलिबाग ०.४६ श्रीवर्धन १.५९, महाड ०.१४ ने टक्केवारी घसरली होती. एकूण ४.३९ टक्क्याने मतांचा टक्का घसरला होता.

# बचतगटांना मदतीचा हात




। माणगाव । प्रतिनिधी ।
सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या नागरिक सेवा फाऊंडेशन माणगाव यांच्यावतीने दिवाळी निमित्ताने विविध महिला बचतगटांना मदतीचा हात देऊन आर्थिक मदत करण्यात आली.

तालुक्यात दिवाळीनिमित्त विविध महिला बचतगट हे फराळ बनवून त्याची विक्री करत असतात. या महिला बचत गटांना भांडवल व विक्रीची मोठी समस्या असते. ही समस्या ओळखून महिला बचत गटांच्या माध्यमातून माणगाव पंचायत समिती येथे हिरकणी महिला बचतगटांच्या माध्यमातून फराळाच्या वस्तूंची विक्री करणाऱ्या महिला बचत गटांना आर्थिक मदत दिली आहे. त्यांच्या व्यवसायात वृद्धी व्हावी यासाठी रोख रक्कम धनादेश त्यांच्याकडे सुपूर्द केला आहे. यावेळी माणगावचे पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप जठार, नागरिक सेवा फाऊंडेशनचे संस्थापक दीपक देशमुख, सुशील कदम, संजय गांधी, रत्नदीप आंबरे, भालचंद्र खाडे, अजित शेडगे, गणेश गोरेगावकर, पुंडलिक मालोरे, रुपेश वाढवल, काशिनाथ गाणेकर आदींच्या उपस्थित होते.

# शैक्षणिक संकुलात रिक्षा स्टँडची निर्मिती

। नेरळ । प्रतिनिधी ।
कर्जत लाडीवाली येथील कोकण ज्ञानपीठ शैक्षणिक संकुलाच्या बाहेर विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी नव्याने रिक्षा स्टॅन्ड बनविण्यात आला आहे. या परिसरात जागृत देवस्थान असलेल्या श्री कोठारी म तेच्या नावे हे रिक्षा स्टॅन्ड बनविण्यात आले आहे. दरम्यान, कर्जतचे माजी नगराध्यक्ष आणि कोकण ज्ञानपीठ संस्थेचे सदस्य शरद लाड यांच्या हस्ते या स्टॅन्डच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले.



कोकण ज्ञानपीठ संस्थेच्या संकुलात अभियांत्रिकी, आयुर्वेद मेडिकल, नर्सिंग तसेच फार्मसी यांची पदवीपर्यंत शिक्षण देणारी ५०हुन अधिक महाविद्यालयांची साखळी आहे. याचवेळी बाजूलाच कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय येथे पदवी आणि पदवीत्तर शिक्षण दिले जात असून या शैक्षणिक संकुलात साधारण ३ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. हे शैक्षणिक संकुल कर्जत रेल्वे स्थानकापासून तीन ते साडे तीन किमी अंतरावर आहे. यामुळे स्कुल बस निघून गेल्यावर विद्यार्थ्यांची मोठी गैरसाय होते. यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन आणि विद्यार्थ्यांना शेअर रिक्षाचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी नोंदणीकृत रिक्षा स्टॅन्ड बनविण्यात आला आहे.



● दरवर्षीप्रमाण श्रीरामकृष्ण विवेकानंद सेवा समिती अलिबागतर्फे तालुक्यातील दुर्गम भागातील आदिवासी पाड्यांवर तसेच गरीब व गरजू अशा ५०० कुटुंबांना दिवाळीनिमित्त फराळ वाटप करण्यात आला. यावेळी सेवा समितीचे उपाध्यक्ष भालचंद्र देशपांडे, सह-सचिव हेमंत लोहार, खजिनदार दिलीप गुर्जर, सदस्य दिनेश माळी, युवक संघाचे प्रमुख वरद पाटील, मानस कुडेकर तसेच सेवा समितीचे युवक भक्त अपस्थित होते.

# अहमद काझी यांची सेवानिवृत्ती

। मुंबई । प्रतिनिधी ।
मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या मरीन खात्यातील फर्स्ट क्लास मास्टर व मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉइज युनियनचे उपाध्यक्ष अहमद काझी हे गुरूवारी (दि.३१) ३६ वर्षाच्या सेवेनंतर निवृत्त झाले आहेत. यानिमित्ताने त्यांचा मरीन खात्यातील शोअर व फ्लोटीला कामगारांच्यावतीने बुधवार (दि.३०) इंदिरा गोदीत जाहीर सत्कार सोहळा संपन्न करण्यात आला. यावेळी मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अॅड. जनरल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष अॅड. एस.के. शेट्ये यांच्या हस्ते अहमद काझी यांचा सत्कार करण्यात आला.



# विभाग नियंत्रकांना निवेदन

**पेण** : पेण हे जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असून महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाकडून प्रवाशांच्या बाबत अनेक गैरसोयी होत आहेत. या गैरसोयी दूर व्हाव्यात यासाठी सुधिर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दिडशे प्रवाशांनी शनिवारी (दि.२६) आपली स्वाक्षरी करून पेण आगार प्रमुख, पनवेल आगार प्रमुख, व्यवस्थापन आणि पेण विभागीय नियंत्रक यांच्याकडे निवेदन दिले आहे. यात पेण बस स्थानकातील स्वच्छता गृहांची दयनिय अवस्था, पिण्याच्या पाण्याची गैरसोय, निवारा शेड तसेच, पेण-पनवेल विनाथांबा बस, गाड्यांचे वेळापत्र नव्याने लावणे, वाहन पार्किंगची सुविधा यासह १४ मागण्यांचो निवेदन दिले आहे. या मागण्या पूर्ण न झाल्यास शिंदे यांच्या नेतृत्वाखाली प्रवासी एक दिवसाचे धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

# महाविद्यालयाची आदिवासींसोबत दिवाळी

। उरण । प्रतिनिधी ।
शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी उरण तालुक्यातील आदिवासी कातकरी बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्यात येते. यावर्षी सारडे ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या बेलडोंगरी या आदिवासी कातकरी वडीवर दिवाळी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात एकूण २५ महिलांना साडी, २७ पुरुषांना कपडे, १२ मुले व १२ मुलींना कपडे, शालेय साहित्य व दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य के.ए. शामा यांनी यावेळी गरीब व आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या आपल्या बांधवांसोबत दिवाळी साजरा करण्याचा उद्देश सर्वांसोबत विशद केला व दिलेली भेट स्वीकारल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनेकांनी आर्थिक मदत केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विशाल पाटेकर, तेजस बाळकृष्ण ठाकूर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे, माजी विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमात महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.



# ऐन दिवाळीत वाहतूक कोंडीची समस्या

। कोलाड । वार्ताहर ।
मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाड बाजापेठेत बुधवारी (दि.३०) रात्री आठ वाजाण्याच्या सुमाराला ऐन दिवाळीच्या दिवशीच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यातून मार्ग काढताना प्रवाशांची तारांबल उडाली असल्याचे चित्र पाहवयला मिळाले.



मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाड-आंबेवाडी हे बाजारपेठेचे मध्यस्थी ठिकाण असुन येथे कोलाडसह खांब, सुतारवाडी, रातवड परिसरातील असंख्य नागरिक ये-जा करीत असतात. सध्या दिवाळीची लगबग सुरु असुन दिवसभर काम करुन कंपनीतील कामगार व शेतकरी वर्ग बुधवारी संध्याकाळी कोलाड नाक्यावर किराणा सामान, आकाश कंदील, फटाके, भाजी पाला, फुले व हार खरेदी करण्यासाठी आले होते. यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाड नाक्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होऊन प्रवासी वर्ग त्रस्त झाला होता.

तसेच, या महामार्गावरील कोलाड पोलिस ठाण्याच्या समोर रस्त्यातच डोजर बंद पडल्यामुळे पुई महिसदरा नदीच्या पुलापासून कोलाड नाक्यापर्यंत दोन किमीच्या अंतरावर वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यामुळे नागरिकांची मार्ग काढतांना तारांबल उडाली. पुई महिसदरा नदी पुलापासून कोलाड तसेच तळवलीपर्यंत एका बाजूच्या मार्गाचे काम सुरु असुन येणारी-जाणारी वाहतूक दुसऱ्या बाजूने वळविण्यात आली होती. यादरम्यान जर एखादे वाहन बंद पडले तर वाहतूक कोंडी निर्माण होऊन याचा नाहक त्रास प्रवासी वर्गाला सहन करावा लागत होता.

# वाचनालयात दिवाळी पहाट संपन्न

। आगरदांडा । प्रतिनिधी ।
मुरूड शहरातील जंजिरा संस्थान कालीन सार्वजनिक वाचनालयात दरवर्षाप्रमाणे पहिल्या अभ्यंगस्नाना दिवशी गुरूवारी (दि.३१) सकाळी पहाटे स्थानिक कलावंताच्या कलाविष्कारातून संगीत दीपोत्सव या विविधरंगी कार्यक्रमाने संपन्न झाला. या दिवाळी पहाट कार्यक्रमाचे उद्घाटन नैनिता कर्णिक यांच्या हस्ते करण्यात आले.

दिवाळी पहाट या कार्यक्रमाची सुरुवात सुप्रसिद्ध गायक सुरेश सद्रे यांच्या गीताने करण्यात आली. तद्नंतर राहुल वर्तक, पूजा सद्रे, मनीष माळी, अमोल रणदिवे, राज पुलेकर, सिद्धेश करंबे, राघव करंबे यांनी अतिशय सुंदर गीते सादर करून प्रेक्षकांची मनं जिकली. यावेळी प्रवीण बैकर, संजय गुंजाळ, ग्रंथपाल उत्कर्ष गुंजाळ, सानिका भायदे आदी कर्मचारी वर्ग व वाचक उपस्थित होते.



# निरंकारी संत समागमाची पूर्वतयारी

। अलिबाग । वार्ताहर ।
समालखा येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी निरंकारी परिवाराचा ७७ वा वार्षिक संत समागम दि. १६, १७ व १८ नोव्हेंबर रोजी आयोजित होत आहे. या तीन दिवसीय संत समागमामध्ये भक्तिच्या अनेक पैलुंवर गीत, विचार आणि कविता आदि माध्यमातून भक्तगण आपले शुभभाव प्रकट करतील. आध्यात्मिकतेचा आधार घेऊन या समागमामध्ये प्रेम, शांति आणि एकत्वाचा संदेश दिला जातो, जो नि:संदेह समस्त मानवतेच्या कल्याणार्थ असतो. यावर्षी सतगुरु माताजींनी 'विस्तार अनंताच्या दिशेने' समागमाचा विषय दिलेला आहे. विशाल रूपात आयोजित होणारा निरंकारी संत समागम प्रभावशाली आणि सुरळीतपणे आयोजित करण्यासाठी निरंकारी मिशनचे भक्त व सेवादार देशाच्या कानाकोपऱ्यातून काही महिने अगोदरपासून येऊन आपल्या निष्काम सेवा समर्पित करत समागमाच्या पूर्वतयारी मध्ये आपले योगदान देत असतात.

# कर्जतमध्ये रांगोळी प्रदर्शनाचा शुभारंभ

। कर्जत । प्रतिनिधी ।
कर्जत शहरातील पाटील आळीमध्ये असलेल्या छत्रपती शिवाजी मंडळाने गेल्या ४९ वर्षांपासून अनेक उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकीचा वारसा जपला आहे. दरवर्षी प्रमाणे दिवाळीच्या दिवसांत रांगोळी प्रर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. उदयोन्मुख कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळावे हाच या मंडळाचा हेतू आहे. हे प्रदर्शन ३ नोव्हेंबरपर्यंत मोफत पाहण्यासाठी खुले ठेवण्यात आले आहे.



या प्रदर्शनात सुनील परदेशी यांनी इंदिरा गांधी, किसन खंडोरी यांनी जोगवा, राजेंद्र दगडे यांनी रतन टाटा, सविता शेलवले यांनी आनंद दिघे, आलिशा जैन यांनी सूर्यकुमार यादव, मनोज चव्हाण यांनी रश्मिका मंदाना, प्रदीप घाडगे यांनी मनोज जरांगे, कुणाल साळवी यांनी अतुल परचुरे, प्रियांका भासे यांनी रोहित शर्मा, आशिष गायकवाड यांनी आलू अर्जुन, अमित कांबळे यांनी राज कुमार यांची रांगोळी साकारली असून नवोदित कलाकारांनीही विविध विषयावरील रांगोळ्या साकारून प्रदर्शनात जिवंतपणा आणला आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● प्रथम पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

● सन स्टोन रीयल इस्टेट साईना कॉम्प्लेक्स बायपास रोड चर्चच्या समोर N.A.प्लॉट अलिबाग परिसरात आहेत. लहान फार्म हाउस प्लॉट स्वतंत्र ७ X १२ ८६६९००६९०२, ९२७०८८८८०३

● आयुर्विमा ऑफीस कामासाठी महिला पाहिजे पत्ता विजयनगर - वरसोली, वरसोली नाक्याजवळ मो.९४२२४९४५९०/७५०७९२९१२८

● विद्यानगर तांत्रिक विद्याल्यामागे क्षितिज बंगला (तळमजला) भाड्याने देणे आहे. ९९६९८२८२३९ /९२७२३८३४७६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# धुक्यांमुळे वातावरण प्रफुल्लीत

## प्रवासी, पर्यटक घेत आहेत धुक्याचा आनंद

। पाली/गोमाशी। वार्ताहर ।
**परतीच्या पावसाला सुरुवात झाली असून जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून पहाटे सर्वत्र धुक्यांची दुलई पसरत आहे. या मनमोहक धुक्यांमुळे वातावरण प्रफुल्लीत होत आहे. डोंगराळ भागात जणू ढगच खाली उतरल्याचा भास होत आहे. प्रवासी व पर्यटक सुद्धा या धुक्यांचा व मनोहारी वातावरणाचा आनंद घेत आहेत.**



जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून सर्वत्र दाट धुक्याची दुलई पसरत आहे. याशिवाय डोंगरावर विशेषतः ताम्हिणी घाटात पांढऱ्या शुभ्र व करड्या रंगांचे ढग दाटत आहेत. जणूकाही येथे स्वर्गच असल्याचा भास होत आहे. विमान प्रवास करतांना विमानातून दिसणाऱ्या ढगांचा अनुभव येथे मिळत आहे. यातच आजूबाजूला पसरलेल्या गर्द हिरवाईने हा अद्भुत नजारा आणखीच बहारदार होतो. यामुळे येथून प्रवासी व पर्यटक सुद्धा ढग, हिरवाई, व धुक्याचा आनंद घेत आहेत. तसेच, हे धुकेमय वातावरण ट्रॅकिंग व पर्यटनासाठी उत्तम असल्यामुळे बरेचसे ट्रेकर व पर्यटक किल्ले, डोंगर, समुद्रकिनारा आदी ठिकाणी भटकंतीसाठी येत आहेत.

### जिल्ह्यात पर्यटन वृद्धी

**रायगड, सुधागड, सरसगड, मानगड, सुरगड, मृगगड, विश्रामगड, कर्नाळा, आदींसह जिल्ह्यातील इतरही उंचावरील किल्ल्यांवर ढग व धुके पसरत आहेत. यामुळे येथे येणारे दुर्गप्रेमी व ट्रेकर्स दुर्गभ्रमंती बरोबरच ढगांची व धुक्याची अनुभूती घेतात. ताजे व प्रफुल्लीत करणारे हे वातावरण सर्वांनाच आकृष्ट करत आहे. यामुळे जिल्ह्यात पर्यटन वृद्धी होतांना दिसत आहे.**

> ट्रेकिंगसाठी हे वातावरण उत्तम आहे. यामुळे विकेंडला ट्रेकिंगचा बेत करतो. डोंगरावर पसरलेले ढग व धुक्यामुळे जिल्ह्यातील वातावरण खुप अल्हाददायक झाले आहे. पहाटे व सकाळी आवर्जून या ढगांचा आणि येथील निसर्ग सौंदर्याचा मनमुराद आनंद लुटत आहे. ताम्हिणी घाटात उतरलेले ढग व हिरवाई प्रचंड आकर्षित करीत आहे.
>
> - मॅकमोहन हुले, ट्रेकर व गिर्यारोहक

# नागाव ग्रामपंचायतीला ओएनजीसीकडून तीन कोटीचा कर

**। उरण । वार्ताहर ।**

**ओएनजीसीतर्फे नागाव ग्रामपंचायतीला वाढीव कर तीन कोटी रुपये मिळाला आहे. हा निर्णय नागाव ग्रामपंचायतीसाठी ऐतिहासिक निर्णय आहे. या निर्णयामुळे येथून पुढे उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नागाव ग्रामपंचायतीला ओएनजीसीकडून दर वर्षाला ५८ लाख रुपये कर मिळणार आहे. या करामधून गावच्या विकासाची विविध कामे करण्यात येणार आहे. शिवाय अनेक प्रश्न मार्गी लागतील, अशी माहिती नागाव ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी किरण केणी यांनी दिली.**

उरण तालुक्यातील समुद्रकिनारी असलेल्या नागाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत ओएनजीसी ही बहुराष्ट्रीय कंपनी कार्यरत आहे. नागावमधील स्थानिक शेतकऱ्यांनी आपल्या शेतजमिनी ओएनजीसी कंपनीच्या प्रकल्पाकरिता दिल्या आहेत.

त्यामुळे ओएनजीसी कंपनीने अनेकांना रोजगार दिला आहे, तसेच नागाव ग्रामपंचायतीला टॅक्ससुद्धा भरत आहे. ओएनजीसी कंपनी नागाव ग्रामपंचायतीला वर्षाला नऊ लाख ६५ हजार रुपये कर देत होती, मात्र २०१२ रोजी हा कर वाढीव स्वरूपात मिळाला नाही. वाढीव कर ग्रामपंचायतीला मिळाला नाही. दर चार वर्षांनी करामध्ये वाढ करावी, असा शासनाचा नियम आहे. असा नियम असतानासुद्धा ग्रामपंचायतीला २०१२ पासून कोणताही वाढीव कर मिळालेला नाही. वाढीव कर मिळावा यासाठी नागाव ग्रामपंचायतीतर्फे उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. ती याचिका आता नागाव ग्रामपंचायतीने जिंकली आहे. त्यानुसार उच्च न्यायालयाने ओएनजीसी कंपनीला आजपर्यंतचे वाढीव कर तीन कोटी व दर चार वर्षांनी वाढीव कर देण्याचे आदेश दिले आहेत. उच्च न्यायालयात वकील सी. जी. गावणेकर यांनी ग्राम पंचायतची बाजू मांडली.

> पाऊणे दोन कोटी रुपये ग्रामपंचायतची पाणीपट्टी थकीत आहे. सव्वा कोटी रुपये स्ट्रीट लाइटचे वीजबिल थकीत आहे. पाणीपट्टी व वीजबिलाचे हे पैसे शासनाला भरायचे आहेत. ग्रामपंचायतला मिळालेल्या तीन कोटी रुपयाच्या करामधून पाणीपट्टी व वीजबिल भरण्यात येणार आहे, तसेच नागाव ग्रामपंचायतीला स्वतः ची जागा नाही. जिल्हा परिषद शाळेच्या जागेत ग्रामपंचायतीची इमारत आहे. त्यामुळे स्वतःच्या हक्काची जागा व इमारत व्हावी, अशी सर्वांची इच्छा आहे. त्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.
>
> चेतन गायकवाड, सरपंच, नागाव ग्रामपंचायत.



## मुरुड समुद्रकिनारा सुना सुना!

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

शालेय विद्यार्थ्यांना दिवाळी सुट्टी जाहीर झाली तरी पर्यटकांचे पाऊले मुरुड समुद्रकिनारी न फिरकल्याने समुद्रकिनारी सन्नाटा पसरला आहे.व्यावसायिक चिंतेत असुन पर्यटकांच्या प्रतीक्षेत आहेत.

जगाच्या नकाशावर नावारुपाला आलेला मुरुड समुद्राकिनारी रोज मुंबई, ठाणे, पुणे आदींसह जिल्ह्यातील शेकडो पर्यटक ये-जा करीत असतात परंतु सध्या पर्यटकांविना किनारे व पर्यटन क्षेत्र ठिकाणी सन्नाटा पसरलेला दिसून येत आहे. ना वर्दळ ना गर्दी यामुळे सर्व हॉटेल व लॉजिंग व्यवसाय ठप्प झाले आहेत. राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक असल्यामुळे यांचा परिणाम पर्यटनक्षेत्र याठिकाणी दिसून येत आहे.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## फुटपाथवर चढवली गाडी

### २ पादचारी जखमी

**। पनवेल । वार्ताहर ।**

गाडीवरील नियंत्रण सुटून एका महिलेने फुटपाथवर गाडी चढविल्याने झालेल्या अपघातात २ जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

खांदा कॉलनीत मुख्य रस्त्यावरच फेरीवाले तसेच फुटपाथ वर मच्छी मार्केट व फेरीवाले बसलेले आहे. या मार्केटमुळे रोजच खांदा कॉलनी रहिवासी ना ट्रॅफिक चा सामना करावा लागतो. शेवटी रस्त्यात फेरीवाले असल्यामुळे कार चालक ही महिला होती कारंच नियंत्रण सुटल्यामुळे मच्छी विकत असणाऱ्या फुटपाथवर ही कार चढली. परंतु आज गुरुवार असल्यामुळे मासळी मार्केट बंद होता त्यामुळे दुर्घटना टळली परंतु एक दोन माणसांच्या पायाला इजा झाली.

## कर्जतमध्ये पोलिसांचा रूटमार्च



**। कर्जत । वार्ताहर ।**

महाराष्ट्रात सर्वत्र विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. निवडणूक काळात अनुचित प्रकार आणि कायदा सुव्यवस्था सुरळीत राहावी याची मुख्य जबाबदारी पोलीस प्रशासनावर असते त्याचाच भाग म्हणून आज कर्जत पोलीस ठाणे आणि सीआयएसएफच्या जवानांकडून रूटमार्च काढण्यात आला.

कर्जत विधानसभा मतदारसंघात कर्जत तालुक्यातील शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागात रूट मार्च काढण्यात आला. सर्वप्रथम कर्जत तालुक्यातील कशेळे या ग्रामीण भागातून सकाळी कशेळे मुख्य बाजारपेठ मधून रूटमार्च काढण्यात आला. दुपारी कडाव येथील मुख्य बाजारपेठ तसेच बौद्ध वाडा येथून वेलकम हॉटेलपर्यंत रूटमार्च काढण्यात आला. त्याचप्रमाणे कर्जत शहरातील कर्जत पोलीस ठाण्यापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून महावीर पेठ ते कर्जत जकात नाका येथून पुढे मुख्य बाजारपेठेतून कर्जत पोलीस ठाणे या ठिकाणी रूट मार्च काढण्यात आला.

या रूटमार्चमध्ये कर्जत पोलीस ठाण्यातील पाच अधिकारी आणि १७ पोलिस अंमलदार तसेच सीआयएसएफचे ४७ जवान सहभागी झाले होते.



## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

गोरख पाटील मित्र परिवार मुंब्रा यांच्या वतीने उद्धर रामेश्वरवाडी येथील ५० कुटुंबांना दिवाळी सणानिमित्त साहित्य भेट देण्यात आली. यामध्ये ५० ब्लँकेट ,६३ सहावारी साड्या, १५ नऊवारी साड्या, मिठाई बॉक्स यांचे वाटप करण्यात आले. तसेच अंगणवाडी व शाळेतील ५० विद्यार्थ्यांना टि-शर्ट, शुज तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. साहित्य वाटप झाल्यानंतर सर्व उपस्थित महिलांनी, ग्रामस्थांनी, तरुणांनी पाहुण्यांचे मनापासून आभार व्यक्त केले.

या कार्यक्रमाला गोरख पाटील मित्र परिवार मुंब्रा यांचे संस्थापक अध्यक्ष गोरख पाटील सर, आयुब शेख, शंकर विश्वकर्मा, इरफान सरगुरोह उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उपस्थित पाहुणे यांचे आभार उल्हास केदारी यांनी मानले.

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड-कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the public at large that we are investigating the title of Mr. Sameer Anil Nerurkar ("Owner") to the parcel of the land ("Land") more particularly described in the Schedule hereunder written.

All or any person having any right, title, interest, claim, demand and/or objections against/upon/in respect of/to the said Lands by way of sale, exchange, lease, tenancy, license, trust, lien, maintenance, easement, inheritance, possession, attachment, mortgage, charge, gift, lis-pendens, right of way or otherwise of any nature whatsoever and in howsoever manner is hereby requested to give written notice of the same to Zunjarrao & Co., Advocates & Solicitors, having their address at 4th Floor, Jalaram Jyot, Janmabhoomi Marg, Fort, Mumbai - 400 001, along with certified true copies of documents in support of such right, title, interest, claim, demand and/or objections within 14 (Fourteen) days from the date of publication of this Notice, failing which it shall be presumed that no such claim, demand or objection exists and even if such claim, demand or objection exists in law or otherwise, it shall be deemed that the claimant has relinquished such claim, demand or objection and/or waived any right to exercise such claim, demand or objection and any such claim or objection shall not be binding.

**SCHEDULE**
**(Description of the Land)**

All that piece and parcel of portion of land admeasuring 00.44.44 (H.A.Sq.Mts.) out of agriculture land bearing Survey No. 4/2/1 admeasuring 01.08.01 (H.A.Sq.Mts.) situated at Village - Gan Tarfe Parhur, Taluka - Alibag, District - Raigad and bounded as follows:

On or towards East :Bearing Survey No. 6/5B/6 & Survey No. 6/5B/7
On or towards South : Forest Land
On or towards West : Bearing Survey No. 6/5B/2 & Survey No. 6/5B/3
On or towards North : Bearing Survey No. 4/1 & Survey No. 6/5B/1

Place: Alibag,
Dated: 1st day of November, 2024

For Zunjarrao & Co.
Sd/-
**Mr. Vikrant Zunjarrao**

### जाहीर नोटीस

तममा लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे चावणे, ता. उरण, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालक १) एलविना स्टिवन आलमेडा, २) विल्यम रिचर्ड फर्नांडीस, ३) जॉन रिचर्ड फर्नांडीस, ४) निकलस रिचर्ड फर्नांडीस, ५) पिटर रिचर्ड फर्नांडीस, ६) मोना सुबर्ट डिसोजा, ७) रशल रिचर्ड फर्नांडीस, ८) आयरिश रॉनी फर्नांडीस, ९) रियंका रॉनी फर्नांडीस, १०) ग्रेग रॉनी फर्नांडीस, ११) मैक्सी सिलवेस्टर फर्नांडीस, १२) वर्नाड सिलवेस्टर फर्नांडीस, १३) ज्यूड सिलवेस्टर फर्नांडीस, १२) फिलोमिना रेनॉल्ड पटेल आणि १३) जेसिंता किशोर मोहिते, यांचेकडुन आमचे आशिल कायम विकत घेण्याचे ठरविले आहे. व आमच्या अशिलानी दिलेल्या माहितीवरून आणि सांगण्यावरून सदरची पेपर नोटीस देण्यास येत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- चावणे, ता. उरण, जि. रायगड**

| गट क्रमांक | उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| २४५ | ३ | ०-१७-००<br>पो.ख. ०-००-२०<br>एकूण क्षेत्र ०-१७-२० | ३.२५ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर त्याचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेहि हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील हक्क-हितसंबंध निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. ३१/१०/२०२४.

**श्री. योगेश स. बाष्टे,**
(ॲडव्होकेट)
पत्ता-ऑफिस क्र.७, तळमजला,
जयनारायण को. हौ. सो. लि., गावदेवी
मंदिराजवळ पनवेल, जि.रायगड ४१० २०६
मो. नं. ८८९८१२१९७१

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे शेलू, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./ हि.नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| वेणुबाई धर्मा गवळी, ताईबाई धर्मा गवळी, चांगुणाबाई लक्ष्मण मसणे, गुलाब शंकर मसणे, हर्षदा शंकर मसणे, | ७८/११ | ००-२६-८०<br>पो.ख. ००-०१-५०<br>एकुण ००-२८-३० | १-७६ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०१/११/२०२४

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता-बी-३०१,सायली निर्माण, निर्माण नगरी,
नेरळ, ता. कर्जत,जि.रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत त्या जमिन मिळकतीचे मालक श्री मनोज यशवंत विशे यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू शेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| गावाचे नाव | स.न. | हि.न | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मौजे - माले, ता. कर्जत, जि. रायगड | २१ | ७ | एकूण क्षेत्र ०१-३४-०० हे. आर.प्रति यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचा अविभक्त हिस्सा००-४४-६६ हे.आर.प्रति विक्री क्षेत्र | ०=९१ |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. ३१/१०/२०२४

सही/-
**ॲड. सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी)मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता-नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत-रायगड मो.नं. ९८८११३२२४८

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल सुजाता पंकज पवार रा. कोपरखैरणे नवी मुंबई यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक चंद्रा उर्फ चंद्रकला गजानन गावडे रा. जांभिवली, ता. खालापुर, जि. रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**मौजे सावेळे ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन**

| स.नं. / हि.नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ५४/२/अ | ०-२०-०० | २.०२ |

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाल, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण: कर्जत
दिनांक: ०१/११/२०२४

सही /-
**ॲड.गीतांजली जी. फुलावरे.**
कार्यालय पत्ता: ''मधुतारा'' बिल्डींग, कचेरी रोड,
कर्जत ता. कर्जत, जि. रायगड.
मो. ८८८८०४५३७६/८६००३५२९८२

### जाहीर नोटीस

**(मौजे खालापुर येथील ग.नं. ३२/१)**

सर्व सामान्य जनतेस व हितसंबधितास या जाहिर नोटसीने कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. सिद्दीक अब्दुल कादर शेख, रा. जुहु मुंबई यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सुचित करण्यात येते की, श्री. बिहारीसरण बाबुलाल खंडेलवाल यांच्या मालकी हक्क व कब्जे ताब्यातील मौजे खालापुर नगरपरिषद हद्दीतील परिशिष्टत नमुद केलेली मिळकत जुना मुंबई - पुणे महामार्ग क्रं. ४ करीता संपादीत झालेले क्षेत्र वगळता बाकी राहिलेल्या क्षेत्रास 'महाराष्ट्र शासन राखीव वने या शिर्षकामुळे बाधा निर्माण झालेली असून ७/१२ अभिलेखाच्या इतर हक्क स्तंभात श्री. बिहारीसरण बाबुलाल खंडेलवाल यांच्या नावाची नोंद असून त्यांच्या शिर्षकास निर्माण झालेली बाधा कायदेशीर मार्गाने दुर करुन' जसे आहे, जिथे आहे या तत्वावर विकत घेण्याचे ठरलेले आहे. सदर व्यवहारापुर्वी आमच्या अशिलाने याच गटा शेजारील गट नं. ३०/१ आणि गट नं. ३१ चे संपूर्ण क्षेत्र नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्रं. कलर ४५५८/२०२४ अन्वये कायमचे विकत घेतलेले असून त्या क्षेत्राशी संबधित असल्याने व वहितीस सोईचे असल्याने विकत घेण्याचे ठरले आहे. तरी परिशिष्टातील नमुद मिळकती विषयी कोणत्याही व्यक्ती व संस्थाचे कोणत्याही स्वरुपाचे हितसंबंध जसे की, गहाण, तारण, साठेखत, करारनामा, ईसारपावती, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेकरारनामा, विक्री करारनामा, विकसन करारनामा, बक्षीसपत्र, चोळी बांगडी, लीज, डिक्री, कुळ तथा ताबा पावती व इतर अशा स्वरुपचे तत्सम, उजर/आक्षेप असल्यास त्यांनी सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्दपासून १५ दिवसाचे आत मुळ कागदपत्रासह आमचे कार्यालयात आपला उजर/आक्षेप लेखी स्वरुपात नोंद व्हावा. मुदतीत आक्षेप/उजर न नोंदवल्यास तो स्वइच्छेने व हेतुपुरस्सर सोडून दिल्याचे गृहित धरून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. सबब ही जाहीर नोटीस जनहितार्थ प्रकाशित केली असे.

**मिळकतीचे परिशिष्ट**
**मौजे खालापुर नगरपरिषद हद्दीतील, ता. खालापुर, जि. रायगड येथील खालील नमुदप्रमाणे व चर्तु:सिमेतील मिळकत.**

| अ. क्रं. | सर्व्हे/ गट नं. | मुळ क्षेत्र | संपादित क्षेत्र | उर्वरित क्षेत्र | आकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३२/१ | ३ हे. ४० आर | ०.१४ आर | ३ हे. २६आर | २रु. १९ पैसे | सदरचे क्षेत्र पोटखराब सह आहे. |

पूर्वेस : सर्व्हे नं. ३१/० व ३२ चा भाग, उत्तरेस :- वनविभागचे जमिन
पश्चिमेस :- मौजे कलोतेरायतेची शिव, दक्षिणेस :- जुना मुंबई- पुणे महामार्ग-४
सबब ही कायदेशीर नोटीस.

दिनांक : ३०/१०/२०२४
ठिकाण: खालापुर

नोटीस देणार
**श्री. सिद्दीक अब्दुल कादर शेख मार्फत**
ॲड. काशिनाथ शिंदे रेणुका लिगल सर्व्हिसेस् ॲण्ड कन्सलटन्सी
द्वारा.श्री. तुकाराम नथु पाटील मु.लोणीवली, पो. चिखली
ता.पनवेल, जि. रायगड ४१०२०६ मो.नं. ९३२५२०५३०८

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही श्रीराम नरहरी घारपुरे, सुरेश नरहरी घारपुरे, सुमित प्रदीप टकले अपाक वडील प्रदिप टकले, प्रदीप बाबुराव टकले यांच्या मालकीची व वहिवाटीची आहे. सदर मिळकतीचे हक्क विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस कायमस्वरूपी तबदिल करण्याचे मान्य केले असून सदर व्यवहारापोटी विसार स्विकारून तशी पावती करून दिली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याचा भरवसा व खात्री त्यांनी आमचे अशिलांना दिली आहे. सदर मिळकत अगर तिचे कुठल्याही भागाबाबत अन्य कुणाचाही आधीचा करार न्यायालयीन आदेश, अव्वल जप्ती, भाडेपट्टा, अन्न वस्त्र, बक्षिस, गहाण, दान, अदलाबदल, रिव्हर्शनर, अग्रहक्क हस्तांतरास असल्यास त्याची लेखी जाणीव अस्सल पूरक दस्तासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत आमच्याकडे आणून द्यावी. विहीत मुदतीत अशी कुठलीही जाणीव आमच्याकडे न झाल्यास सदर मिळकत अगर तिचे कुठल्याही भागावर अन्य कुणाचाही कसलाच हक्क, हितसंबंध नव्हता व नाही वा असल्यास तो जाणीवपूर्वक कायमचा विनामोबदला सोडून दिला असल्याचे समजून आमचे अशिल नियोजित व्यवहार पूर्ण करतील, मागाहून त्याबाबत कोणतीही कसलीही तक्रार चालणार नाही.

मिळकतीचे परिशिष्ट : मे सब रजिस्ट्रार श्रीवर्धन यांचे तसेच पंचायत समिती तालुका श्रीवर्धन, जिल्हा परिषद रायगड यांच्या हद्दीतील मौजे निवळे, तुकडी पोटतुकडी ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील मिळकती

| अ.नं. | मालकाचे नाव | गट नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीराम नरहरी घारपुरे | २९ | ०.१७.७०<br>+०.०१.५०<br>०.१९.२० | १.३१ |
| २ | श्रीराम नरहरी घारपुरे | ३०/७ | ०.८१.००<br>+०.०८.००<br>०.८९.०० | ०.४२ |
| ३ | श्रीराम नरहरी घारपुरे | ३१/१फ | १.०४.००<br>+०.२४.३०<br>१.२८.३० | ०.४७ |
| ४ | श्रीराम नरहरी घारपुरे | २२/१ ई | ०.६२.००<br>+०.१५.००<br>०.७७.०० | ०.३४ |
| ५ | सुरेश नरहरी धारपुरे | २१/१ग | ०.८७.५०<br>+०.१२.२०<br>०.९९.७० | ०.४५ |
| ६ | सुरेश नरहरी धारपुरे | १२/१क | ०.७४.००<br>+०.१७.००<br>०.९१.०० | ०.४१ |
| ७ | सुरेश नरहरी घारपुरे | २३/१ब | १.७९.००<br>+०.४२.००<br>२.२१.०० | ०.९३ |
| ८ | सुरेश नरहरी घारपुरे | २४/१अ | १.५४.००<br>+०.३६.००<br>१.९१.०० | ०.८० |
| ९ | सुरेश नरहरी घारपुरे | २४/१ब | १.५२.००<br>+०.३६.००<br>१.८८.०० | ०.८० |
| १० | सुरेश नरहरी घारपुरे | २५/१अ | २.१४.००<br>+०.४९.००<br>२.६३.०० | ०.९६ |
| ११ | सुरेश नरहरी घारपुरे | २५/१ड | २.१३.००<br>+०.४९.००<br>२.६२.०० | ०.९५ |
| १२ | सुरेश नरहरी घारपुरे | २६/१अ/४ | १.००.००<br>+०.२३.००<br>१.२३.०० | ०.५२ |
| १३ | सुरेश नरहरी घारपुरे | २६/१ब | १.००.००<br>+०.२३.००<br>१.२३.०० | ०.५२ |
| १४ | सुमित प्रदीप टकले अपाक वडील प्रदीप टकले | १६/१ल | २.१८.००<br>+०.३२.००<br>२.५०.०० | १.४४ |
| १५ | सुमित प्रदीप टकले अपाक वडील प्रदीप टकले | २१/१फ | ०.८७.५०<br>+०.१२.२०<br>९९.७० | ०.४५ |
| १६ | सुमित प्रदीप टकले अपाक वडील प्रदीप टकले | २४/१ड | १.५३.००<br>+०.३५.००<br>१.८८.०० | ०.७८ |
| १७ | सुमित प्रदीप टकले अपाक वडील प्रदीप टकले | १५ | ६.०२.००<br>+०.८६.००<br>६.८८.०० | ४.०६ |
| १८ | सुमित प्रदीप टकले अपाक वडील प्रदीप टकले | २३/१अ/२ | १.७९.००<br>+०.४१.००<br>२.२०.०० | ०.९४ |
| १९ | सुमित प्रदीप टकले अपाक वडील प्रदीप टकले | २५/१ब | २.१५.००<br>+०.४९.००<br>२.६४.०० | ०.९५ |
| २० | सुमित प्रदीप टकले अपाक वडील प्रदीप टकले | २६/१अ/२ | १.००.००<br>+०.२४.००<br>१.२४.०० | ०.५२ |
| २१ | सुमित प्रदीप टकले अपाक वडील प्रदीप टकले | २६/१अ/३ | १.००.००<br>+०.२२.००<br>१.२२.०० | ०.५२ |
| २२ | प्रदिप बाबुराव टकले | १६/१ह | ०.४४.००<br>+०.०६.००<br>०.५०.०० | ०.३० |
| २३ | प्रदिप बाबुराव टकले | २१/१क | ०.४७.५०<br>+०.१३.३०<br>०.६०.८० | ०.२४ |
| २४ | प्रदिप बाबुराव टकले | २२/१ब | १.६२.००<br>+०.३२.००<br>१.९४.०० | १.०६ |
| २५ | प्रदिप बाबुराव टकले | २१/१ड | ०.८७.५०<br>+०.१३.३०<br>१.००.८० | ०.४५ |
| २६ | प्रदिप बाबुराव टकले | ९/१ब | १.६२.०० | ०.८४ |
| २७ | प्रदिप बाबुराव टकले | ९/१अ/५ | ०.७४.००<br>+०.२१.००<br>०.९५.०० | ०.३६ |

पुणे
दि. २९/१०/२०२४

**ॲड. संतोष आर.पाटील**
ऑफिस नं. ५१५, ५ वा मजला,
अमित कोर्ट बिल्डिंग,
सिटी. एस. नं. ९५ए/१. साईबाबा
गल्ली रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००५,
मो.नं. ९८२२३७३५८५

# क्रिकेट बनला जिवघेणा खेळ

## १५ वर्षीय मुलीचा दुर्दैवी मृत्यू

**। केरळ । वृत्तसंस्था ।**

क्रिकेट खेळताना जर सुरक्षेची काळजी घेतली नाही, तर खेळाडूच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. असाच काहीसा प्रकार केरळमध्ये घडला आहे. या ठिकाणी क्रिकेट खेळताना एका १५ वर्षीय मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

ही दुदैवी घटना केरळमधील कोट्टाक्कल शहरात घडली आहे. या मुलीचे नाव तपस्या असून ती मूळची महाराष्ट्राची रहिवासी आहे. क्रिकेटच्या सरावाच्या वेळी तिच्या डोक्याला चेंडू लांगून गंभीर दुखापत झाली. यानंतर तिला त्वरीत जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. परंतु, कालांतराने तिची प्रकृती अधिकच खालावत गेली. यानंतर तपस्याच्या कुटुंबीयांनी तिला महाराष्ट्रातील रुग्णालयात हलवले. मात्र, डोक्याला झालेली दुखापत गंभीर असल्यामुळे बुधवारी (दि.३०) तिचा मृत्यू झाला.

तपस्या ही दहावीची विद्यार्थिनी होती, जी तिच्या शाळेतील मित्रांसोबत हेल्मेट न घालता क्रिकेटचा सराव करत होती. मिळालेल्या माहितीनुसार, गोलंदाज जेव्हा चेंडू टाकण्यासाठी धाव घेत होता, तेव्हा तपस्याचे लक्ष खेळपट्टीवर पडलेल्या एका गोष्टीकडे गेले. अशा परिस्थितीत या १५ वर्षीय



मुलीने पुल शॉट खेळण्याचा प्रयत्न केला. परंतु, चेंडूचा बॅटशी संपर्क झाला नाही आणि तो सरळ तिच्या डोक्यावर जाऊन आदळला. डोक्याला चेंडू लागल्यानंतर तपस्या लगेचच जमिनीवर पडली.

क्रिकेटचा चेंडू खूप कठीण असतो. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्येही फलंदाज मैदानावर खेळण्यासाठी पूर्ण सुरक्षिततेने येत असतात. काही वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलियाच्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये अशीच एक घटना घडली होती. २०१४ मध्ये ऑस्ट्रेलियाचा उदयोन्मुख खेळाडू फिल ह्यूज याचा क्रिकेटचा चेंडू लागून दुर्दैवी मृत्यू झाला होता.

# गिलचा गुजरातमध्येच राहण्याचा निर्णय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सध्याचा आयपीएल चॅम्पियन कर्णधार श्रेयस अय्यर, केएल राहुल आणि ऋषभ पंत यांसारख्या दिग्गजांच्या सध्याच्या संघातून बाहेर असल्याच्या बातम्यांनी आधीच परिस्थिती रोमांचक बनवली आहे. आता गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिलबाबतही मोठा दावा केला आहे. अलीकडेच, गेल्या मोसमात कर्णधार बनलेल्या गिलने गुजरात सोडल्याच्या बातम्या आल्या होत्या आणि आता एक मोठा संघ त्याला विकत घेण्याची तयारी करत असल्याचे सांगण्यात येत आहे, पण तसे होऊ शकले नाही. मात्र, याआधीच गिलने मोठा निर्णय घेतला आहे.

बेंगळुरू फ्रँचायझीने नुकतीच शुभमन गिलशी लिलावाबाबत चर्चा केली होती. गिलला फ्रँचायझीमध्ये आणण्यामागचा विचार संघाला भविष्यासाठी तयार करण्याचा होता, असे या अहवालात सांगण्यात आले आहे. अशा स्थितीत बेंगळुरूने गिलशी संपर्क साधला पण चर्चा यशस्वी झाली नाही आणि गिलला लिलावात येण्यासाठी बेंगळुरूला पटवता आले नाही. गिलचा गुजरात टायटन्समध्ये राहण्याचा निर्णय हे त्याचे एक मोठे कारण आहे. गिलने त्याच्या सध्याच्या संघात राहण्याचा निर्णय घेतला आहे, जिथे तो गेल्या ३ हंगामात होता.



# भारताचे कांगारूंसमोर लोटांगण

## स्टार फलंदाज ठरले अपयशी

**। मॅके । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील भारत 'अ' व ऑस्ट्रेलिया 'अ' यांच्यातील पहिल्या सामन्याला सुरूवात झाली असून ऑस्ट्रेलियाने पहिल्याच दिवसापासून आपले वर्चस्व दाखवण्यास सुरूवात केली आहे. भारतातील अवघ्या ३ फलंदाजांना २ आकडी धावसंख्या करता आली. पण कोणालाही अर्धशतकापर्यंत मजल मारता आली नाही. ब्रेंडन डॉगेटने भारताचा निम्मा संघ म ाघारी पाठवला आणि ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी भारताचा डाव अवघ्या १०७ धावांवर गुंडाळला.





भारतीय संघ प्रथम फलंदाजीसाठी आला. कर्णधार ऋतुराज गायकवाडसह ३ भारतीय फलंदाज शुन्यावर बाद झाले. सलामीवीर अभिमन्यू ईश्वरन ७ धावांवर बाद झाला, तर इंद्रजित ९ धावा तर इशान किशनला ४ धावा करता. यानंतर साई सुदर्शन २१ धावा, देवदत्त पडिकल ३६ धावा व नवदीप सैनीने २३ धावांचे योगदान दिले. यामध्ये ब्रेंडन डॉगेट याला भारताचे ६ खेळाडू बाद करण्यात यश आले. त्याला जॉर्डन बकिंगहॅमने २ बळी घेत साथ दिली, तर फर्गस ओ'नेल व टॉड मर्फी यांना प्रत्येकी एक बळी मिळाला. यामुळे भारताचा डाव ऑस्ट्रेलियन गोलंदाजांना १०७ धावांवर गुंडाळण्यात यश आले.

यानंतर खेळायला आलेल्या ऑस्ट्रेलिया संघाचे ९९ धावांवर चार गडी बाद करण्यात भारताला यश मिळाले आहे. यात ऑस्ट्रेलिया संघाचा सॅम कान्स्टस (०), मार्कस हॅरिस (१७), कॅमरॉन बॅंक्रॉफ्ट (०) व बीऊ वेब्स्टर यांचा समावेश आहे. तर, दिवसाअखेर ऑस्ट्रेलियाचा कर्णधार नेथन मॅकस्विनी (२९) व कूपर कॉनोली (१४) हे मैदानवर होते. यावेळी भारताच्या मुकेश कुमार व प्रसिद्ध कृष्णा यांना प्रत्येकी दोन बळी घेतले आहेत.

## हाँगकाँग सिक्सेस क्रिकेट टुर्नामेंट

# भारत-पाकिस्तानचा महामुकाबला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

हाँगकाँगमध्ये यंदा तब्बल सात वर्षांनंतर हाँगकाँग सिक्सेस क्रिकेट टुर्नामेंट होणार आहे. या स्पर्धेत एकूण १२ संघ खेळणार आहेत. क्रिकेटच्या सर्वसाधारण स्पर्धेपेक्षा ही स्पर्धा वेगळी असून अधिक रंगतदार होणार आहे.

हाँगकाँग सिक्सेस क्रिकेट टुर्नामेंट ही स्पर्धा १ ते ३ नोव्हेंबर या कालावधीत होणार आहे. या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तानसह यजमान हाँगकाँग, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड यूएई, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ आणि ओमान अशा १२ यंघांचा सहभाग आहे.

सर्वसाधारण क्रिकेट संघात ११ खेळाडू असतात. पण, या स्पर्धेतील संघात फक्त ६ खेळाडू असणार आहेत. ५ षटकांचा हा खेळ असून प्रत्येक खेळाडूला फक्त एक षटक टाकायला मिळणार आहे. याम ुळे दबावाच्या क्षणी कोणता गोलंदाज गोलंदाजी करणार याचा निर्णय घेणे कर्णधाराला आव्हान असेल. याचबरोबर संघातील सर्व ६ फलंदाज बाद होईपर्यंत संघ खेळणार आहे. यात पाचवा फलंदाज बाद झाल्यानंतर शेवटचा खेळाडू एकटाच फलंदाजी करेल.

यावेळी भारताचा पहिला सामना १ नोव्हेंबरला पाकिस्तानशी भारतीय वेळेनुसार ११:३० वाजता सुरू होणार आहे. भारतीयांना हे सामने स्टार स्पोर्ट्स नेटवर्क तसेच फॅनकोडच्या माध्यमातून लाईव्ह पाहता येणार आहेत.

**भारतीय संघः**

**रॉबिन उथप्पा (कर्णधार), मनोज तिवारी, केदार जाधव, शाहबाज नदीम, स्टुअर्ट बिन्नी, भरत चपली आणि श्रीवत्स गोस्वामी.**

**पाकीस्तानी संघः**

**फहीम अश्रफ (कर्णधार), आसिफ अली, शाहाब खान, मुहम्मद अखलाक, दानिश अली, आमेर यामिन, आणि हुसैन तलाक.**

# विराट, रोहितची पाठराखण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना पुन्हा फॉर्मात येण्यासाठी वेळ द्यायला हवा आणि संयमही राखायला हवा. त्यांना लय सापडली की पुन्हा एकदा यशाचा आलेख मोठ्या प्रमाणात उंचावला जाईल, असा विश्वास भारतीय संघाचे फलंदाजी प्रशिक्षक अभिषेक नायर यांनी व्यक्त केला आहे.



न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत ०-२ असे पिछाडीवर पडलेल्या भारताने मुंबईत होणाऱ्या तिसऱ्या आणि अंतिम कसोटी सामन्यासाठी जोरदार सरावाने सुरुवात केली आहे. बंगळूरू आणि पुणे कसोटीत झालेल्या चुका सुधारण्यासाठी हा सराव महत्त्वाचा होता. सराव सुरू होण्यापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत नायर यांनी विविध विषयांवर मतप्रदर्शन केले. यात अर्थात प्रमुख मुद्दा होता तो रोहित आणि विराट यांच्या अपयशाचा. रोहित आणि विराटबाबत विचारले असता नायरने अर्थातच त्यांची पाठराखण केली आहे. या दोघांना त्यांच्या पद्धतीने पुन्हा फॉर्मात येण्यासाठी वेळही द्यायला हवा, असे सांगितले. सर्वच जण कठोर मेहनत घेत आहेत. त्यांचा दृष्टिकोन आणि हेतूही प्रामाणिक आहे, म्हणूनच थोडा वेळ देणे महत्त्वाचे आहे, असेही मत नायर यांनी व्यक्त केले आहे.



● पुण्यातील बालेवाडी येथे झालेल्या राज्यस्तरीय १३ वर्षाखालील कराटे स्पर्धेत प्रशिक्षक संतोष कवळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्लोक सुजित पाटील याने कांस्यपदक पटकावले आहे. यावेळी त्याचा ग्रामपंचायत सदस्य जयेश पाटील, कार्ले ग्रामस्थ जयवंत पाटील, संजय पाटील, प्रशांत पाटील, अभिजित वार्डे, मिलिंद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

# विजेत्या कर्णधाराला बाहेरचा रस्ता

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीग २०२५ हंगामाचा लिलाव नोव्हेंबरच्या अखेरीस होणार असून गुरूवारी (दि.३१) सर्व फ्रँचायझींना संघात कायम केलेल्या खेळाडूंची नावे जाहीर केली आहेत.



यातही कोलकाता नाईट रायडर्सने संघात कायम केलेल्या ५ खेळाडूंची नावे पाहून अनेक क्रिकेट चाहत्यांना चकीत केले आहे. कोलकातांने आयपीएल २०२४ स्पर्धेचे विजेतेपद श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली खेळताना जिंकले होते. मात्र, आता कोलकाता श्रेयस अय्यरलाच लिलावापूर्वी संघातून बाहेर केले आहे. श्रेयस अय्यरला संघात करारमुक्त करण्याचा निर्णय कोलकाचा फ्रँचायझीने घेतला आहे. श्रेयसच्या नेतृत्वाबाबत सांगायचे झाले, तर त्याचे आयपीएलमधील नेतृत्व आत्तापर्यंत चांगले राहिले आहे. त्याच्या नेतृत्वात २०१९ आणि २०२० साली दिल्ली कॅपिटल्सन प्लेऑफमध्ये प्रवेश केला होता. तसेच २०२० मध्ये अंतिम सामनाही खेळला होता.

# रोहित मुंबईचाच शिलेदार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

मुंबई इंडियन्सने जसप्रीत बुमराहला १८ कोटी देऊन सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. यापाठोपाठ सूर्यकुमार यादव व हार्दिक पांड्या यांना १६.३५ कोटी देऊन सूवणमध्य शोधला. तसेच, रोहित शर्मासाठी त्यांनी १६.३० कोटी मोजले, तर तिलक वर्माला ८ कोटी दिले. या पाच खेळाडूंना कायम राखून त्यांनी आरटीएम कार्ड राखून ठेवले आहे.

आयपीएल इतिहासातील मुंबई इंडियन्सकडून रोहित शर्माने सर्वाधिक सामने खेळले आहेत. मुंबई इंडियन्सने संघात कायम राखल्यानंतर रोहित शर्मा म्हणाला की, पुन्हा मुंबई इंडियन्सचा भाग होण्यासाठी मी उत्साहित आहे. मी मुंबईत खूप क्रिकेट खेळलो आहे. याच ठिकाणाहून मी माझ्या क्रिकेट कारकिर्दीला सुरुवात केली. यामुळे हे शहर खूप खास आहे आणि मला येथे आल्याचा आनंद होत आहे.

# दक्षिण आफ्रिकेचा दणदणीत विजय

**। चट्टोग्राम । वृत्तसंस्था ।**

दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या कसोटी सामन्यात बांगलादेशवर दणदणीत विजय मिळवला आहे. दक्षिण आफ्रिकेने दोन सामन्यांची कसोटी मालिका २-० अशी जिंकली असून भारताची धडधड वाढवली आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यासाठीची चुरस आता आणखी वाढली आहे.

दक्षिण आफ्रिकेने पहिला डाव ६ बाद ५७५ धावांवर घोषित केला होता. टॉनी डी झॉर्जी (१७७), त्रिस्तान स्तब्स (१०६) आणि वियान मुल्डर (१०५) यांच्या शतकांच्या जोरावर आफ्रिकेने बांगलादेशला बॅकफूटवर फेकले होते. बांगलादेशचा पहिला डाव १५९ धावांवर गुंडाळून आफ्रिकेने मोठी आघाडी घेतली होती. बांगलादेशकडून मोमिनूल हकने सर्वाधिक ८२ धावा केल्या होत्या. आफ्रिकेच्या कागिसो रबाडाने ५ बळी घेतले. तर, डेन पीटरसन व केशव महाराज यांनी प्रत्येकी २ बळी टिपले. ४१६ धावांची आघाडी हातात असल्याने आफ्रिकेने बांगलादेशला फॉलोऑन दिला होता.

बांगलादेशच्या दुसऱ्या डावाला सेनुरन मुथूस्वामी व केशव महाराज या फिरकीपटूंनी सुरंग लावला. कर्णधार नजमूल होसैन शांतोने ३६ धावांची खेळी केली. बांगलादेसच्या सहा फलंदाजांना दुहेरी आकडाच गाठता आला नाही. बांगलादेश दुसऱ्या डावात १४३ धावांवर गडगडला. केशव महाराजने ५, तर मुथूस्वामीने ४ बळी घेतले. आफ्रिकेने हा सामना एक डावाने जिंकला.



जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतालिकेत भारत (६२.८२) व ऑस्ट्रेलिया (६२.५०) हे दोन संघ अव्वल स्थानावर आहेत. परंतु फायनलच्या शर्यतीत ५ संघांम ध्ये चुरस रंगणार आहे. श्रीलंका (५५.५६), न्यूझीलंड (५०) आणि दक्षिण आफ्रिका (५४.१७) हेही संघ फायनलच्या शर्यतीत आहेत. बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीपूर्वी आफ्रिकेची टक्केवारी ४६.६२ इतकी होती.

## सुवर्ण महोत्सवी कुमार, कुमारी खो-खो स्पर्धा

# धाराशिव, सांगली विजेतेपदासाठी लढणार

**। धाराशिव । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व उस्मानाबाद जिल्हा खो-खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा सुवर्ण महोत्सवी कुमार व कुमारी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा धाराशिव येथील शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर सुरू आहेत. या स्पर्धेतील अंतिम लढत कुमार व कुमारी या दोन्ही गटातून यजमान धाराशिव आणि सांगली यांच्यातच होणार आहे.

या स्पर्धेत कुमारी गटाच्या उपांत्य सामन्यात सांगलीने



सोलापूरला १०-७ असे तीन गुणांनी नमविले आहे. मध्यंतराची ५-३ ही आघाडीच त्यांना विजय मिळवून दिली. प्रतीक्षा बिराजदार हिने आपल्या धारदार आक्रमणात पाच गडी बाद करीत ४ मिनिटे पळतीचा खेळ केला. सानिका चाफे हिने ४ मिनिटे संरक्षण करीत तिला साथ दिली. सोलापूरच्या स्नेहा लामकाने व प्राजक्ता बनसोडे यांची खेळी अपुरी पडली. तर, दुसऱ्या सामन्यात धाराशिवने ठाण्यावर ११-७ असा डावाने विजय मिळविला. त्यांच्या विजयाचे शिल्पकार अष्टपैलू कामगिरी करणारे अश्विनी शिंदे व प्रणाली काळे हे ठरले. मात्र, ठाण्याच्या दीक्षा काटेकर हिचे प्रयत्न अपुरे पडले.

कुमार गटातील उपांत्य सामन्यातही सोलापूरला सांगलीकडून १५-१९ अशी हार पत्करावी लागली आहे. मध्यंतराची ७-१० ही पिछाडीच सोलापूरला महागत पडली. सांगलीच्या पार्थ देवकतेने आपल्या धारदार आक्रमणात सहा गडी बाद करीत १:१० मिनिटे पळती केली. अथर्व पाटील यानेही अष्टपैलू कामगिरी केली. परंतु, सोलापूरकडून शुभम चव्हाण व अमरान शेख यांची लढत अपुरी ठरली. तर, दुसऱ्या उपांत्य सामन्यात भरतसिंग वसावेच्या अष्टपैलू खेळामुळे धाराशिवने पुण्यावर १३-१२ असा १ गुण व ४:५० मिनिटे राखून विजय मिळविला. हरद्या वसावे याने त्याला साथ दिली. परुतु, पुण्याच्या चेतन गुंडगल याची अष्टपैलू खेळी अपुरी पडली.

# तमिळ थलैवाजची एकतर्फी मात

**। गचीबोवली । वृत्तसंस्था ।**

तमिळ थलैवाजने प्रो-कबड्डी लीग २०२४ मध्ये बुधवारी (दि.३०) तिसऱ्या विजयाची नोंद केली आहे. तमिळ संघाने हैदराबादच्या गचीबोवली येथील जीएमसीबी इनडोअर स्टेडियमवर गुजरात जायंट्सचा ४४-२५ असा पराभव केला. नरेंदर कंडोला (१५), सचिन (५) यांनी चढाईत वर्चस्व गाजवले, तर नितेश कुमार (४), आमीर होसैन (४) व साहिल गुलिया (५) यांच्या पकडीने गुजरातचे आक्रमक थोपवून लावले. फॉर्मात असलेल्या तमिळ संघाने सुरुवातीच्या १० मिनिटांत गुजरातला कडवी टक्कर दिली.



तमिळ संघाच्या नरेंदर कंडोलाला गुजरातच्या गुमान सिंगने चांगली टक्कर दिली होती. परंतु, तमिळने ११-९ अशी आघाडी मिळवून पहिल्या सत्राचा पहिला टप्पा गाजवला. दोन्ही संघांनी पकडीचे प्रत्येकी १-१ गुणच घेतले होते, तर तमिळने चढाईत ९ गुण घेताना १० मिनिटांत आघाडी घेतली. पहिल्या सत्राच्या दुसऱ्या टप्प्यात गुजरातने चांगले पुनरागमन केले आणि तमिळला त्यांनी चुका करण्यास भाग पाडून पिछाडी १२-१३ अशी एका गुणावर आणली. १३-१३ अशी बरोबरी असताना गुजरातसाठी डू ऑर डाय रेड होती, तर तमिळला सुपर टॅकलची संधी होती. त्यात आमीरने गुजरातच्या खेळाडूची उल्लेखनीय पकड करून तमिळला १५-१३ अशी आघाडी मिळवून दिली. तमिळ संघाने पुन्हा एक सुपर टॅकल केली, यावेळीही आमीर होसेनने चांगली पकड केली. सलग दोन सुपर टॅकलमुळे तमिळ संघाने १७-१४ अशी आघाडी वाढवली. पहिल्या सत्रामध्ये तमिळ संघाने आघाडी बनवून सामन्यात चांगले पुनरागमन केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)